रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक २१८
www.ramprahar.com
# राम प्रहर
शनिवार, २४ फेब्रुवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
सिडको उपाध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालकपदी विजय सिंघल/३
विनयभंगप्रकरणी आरोपीस पाच वर्षे सक्तमजुरी/५
रूटच्या शतकाने इंग्लंडला सावरले; ७ बाद ३०२ धावा/८

## बुलेट ट्रेनचा पहिला टप्पा २०२६पर्यंत कार्यान्वित -रेल्वेमंत्री

**मुंबई** : पंतप्रधान नरेंद्र मोदींचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प बुलेट ट्रेनचे काम जोरदार सुरू आहे.



रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव मुंबई दौऱ्यावर आले असताना प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी बुलेट ट्रेन प्रकल्पाबाबत माहिती दिली. मुंबई आणि अहमदाबाद या ५०८ किमी लांबीच्या बुलेट ट्रेन कॉरिडॉरवरील सुरत-बिलिमोरा हा पहिला टप्पा जुलै-ऑगस्ट २०२६पर्यंत कार्यान्वित होऊ शकतो. यानंतर एकामागून एक अन्य टप्पे सुरू करण्यात येतील. मर्यादित थांब्यांसह बुलेट ट्रेन मुंबई ते अहमदाबाद हे अंतर अवघ्या दोन तासांत पूर्ण करू शकेल, तर इतर सेवांमध्ये हेच अंतर सुमारे दोन तास ४५ मिनिटांत कापले जाऊ शकेल. बुलेट ट्रेन प्रकल्पांतर्गत १२ स्थानके असतील. नॅशनल हायस्पीड रेल कॉर्पोरेशन लि.च्या माध्यमातून अंमलबजावणी केली जात आहे, असे रेल्वेमंत्र्यांनी सांगितले.

# पनवेल मनपाचा महिला सशक्तीकरणावर भर

## ३९९१ कोटी ९९ लाखांचा शिलकी अर्थसंकल्प सादर

**पनवेल : प्रतिनिधी**

**महिला सशक्तीकरणाला प्राधान्य देणाऱ्या ३९९१ कोटी ९९ लाख रुपयांच्या सन २०२४-२५च्या पनवेल महापालिकेच्या शिलकी अर्थसंकल्पाला महापालिका आयुक्त व प्रशासक गणेश देशमुख यांनी शुक्रवारी (दि.२३) मंजुरी दिली. ३२ लाख शिलकीचा कोणतीही कर किंवा दरवाढ व शुल्कवाढ नसलेला हा अर्थसंकल्प असून ज्येष्ठ नागरिकांना विरंगुळा केंद्राबरोबरच एनएमएमटीच्या बसमध्ये आता शंभर टक्के सवलत मिळणार आहे.**



पनवेल महापालिकेचे सन २०२४-२५चा अर्थसंकल्प मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे यांनी प्रशासकीय स्थायी समितीच्या बैठकीत आयुक्त तथा प्रशासक गणेश देशमुख यांच्याकडे सुपूर्द केला. त्यांनी तो मंजूर केल्याचे जाहीर केले. या अर्थसंकल्पामध्ये महापालिका क्षेत्रातील पायाभूत सुविधांबरोबरच महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने विविध उपाययोजनांवर भर देण्यात आला आहे.

या वेळी अतिरिक्त आयुक्त भारत राठोड, उपायुक्त सचिन पवार, गणेश शेटे, कैलास गावडे, डॉ.वैभव विधाते, सहाय्यक संचालक नगररचना अधिकारी ज्योती कवाडे, मुख्य अभियंता संजय जगताप, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्हारेकाटे, उपमुख्य लेखापरीक्षक संदीप खुरपे, कार्यकारी अभियंता संजय कटेकर, उपअभियंता विलास चव्हाण, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, सचिव तिलकराज खापर्डे उपस्थित होते.

यानंतर आयुक्तांनी सांगितले की, मागील वर्षीच्या अर्थसंकल्पात आरोग्य सुविधांना महत्त्व देण्यात आले होते. त्यामध्ये असलेली १५ आरोग्य केंद्र, कळंबोली येथील ७५ खाटांच्या रुग्णालयासह बहुतांश कामे पूर्ण झाली आहेत. यात सगळ्या सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नोकरदार माणूस रात्री कामावरून येतो. त्यांच्या सोयीसाठी रात्री उशिरापर्यंत दवाखाने सुरू ठेवण्यात आले. त्याचा फायदा अनेकांना झाला. नवी मुंबईला आदर्श मानून काम करीत आहोत. त्यामुळे याचे वैशिष्ट्य म्हणजे आमच्याकडे आता १२३० कोटीच्या ठेवी जमा आहेत. आम्ही हा अर्थसंकल्प महिला शक्तीला सक्षम करण्यासाठी बनवला आहे. त्यांच्यासाठी खास योजना यामध्ये आहेत. ज्येष्ठ नागरिकांसाठीही खास तरतुदी केल्या आहेत. महापालिका हद्दीतील राष्ट्रीय, व राज्य पातळीवरील खेळाडूंना आर्थिक मदत केली जाणार आहे. आजचा अर्थसंकल्प हा ३२ लाख रुपयांचा शिलकीचा आहे. त्यामध्ये एकूण जमा ३९९१ कोटी ९९ लाख; तर एकूण खर्च ३९९१ कोटी ६७ लाख आहे. तो महिलांसाठी समर्पित करतो.

### आयुक्तांनी मानले सर्वांचे आभार

या वेळी आयुक्त व प्रशासक गणेश देशमुख यांनी केंद्र सरकारने अमृत योजना दिली, त्याबद्दल त्यांचे व राज्य शासनाने त्यांचा वाटा उचलल्याबद्दल त्यांचेही आभार मानले. त्याचप्रमाणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, पालकमंत्री उदय सामंत, मंत्री आदिती तटकरे, खासदार श्रीरंग बारणे यांचे आभार मानले. जीएसटी अनुदान मिळण्यात फार मोठे योगदान आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी दिल्याने त्यांचे तसेच माजी सभागृह नेते परेश ठाकूर, पत्रकार, नागरिक यांचेही आभार मानले.

**महिला सक्षमीकरण**

✻ महिलांच्या सशक्तीकरणावर भर देणाऱ्या या अर्थसंकल्पात महिला व बालविकास योजनांसाठी २२५ कोटी ५० लाख इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

**पनवेल सुकन्या योजना**

✻ मुलगी जन्माला आल्यावर तिच्या सर्वांगीण विकासासाठी आर्थिक मदत करणे. (पिवळे/केशरी रेशनकार्डधारक) पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील मुलीच्या जन्मानंतर मुलींना ३० हजार रुपये आणि पहिली मुलगी असताना दुसऱ्या मुलीनंतर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणाऱ्या पालकांच्या दोन्ही मुलींना प्रत्येकी ३० हजार रुपये असे एकूण एका कुटुंबास ६० हजार अतिरिक्त अर्थसहाय्य करण्यात येणार आहे.

✻ युवतींना परदेशातील उच्च शिक्षणासाठी अर्थसहाय्य देणे. प्रति लाभार्थी युवतीस अभ्यासक्रमास येणाऱ्या खर्चापोटी प्रतिवर्ष ५० हजार रुपये अर्थसहाय्य देण्यात येईल. (पिवळे/केशरी रेशनकार्डधारक)

(पान २ वर..)

### प्राथमिक शिक्षण होणार डिजिटल

*पनवेल महापालिकेचा इंग्रजी माध्यम शाळेचा सिनिअर केजी वर्ग गतवर्षी सुरू करण्यात आला होता. त्याला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. हा प्रतिसाद पाहून महापालिकेने पहिली ते पाचवीपर्यंतच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. त्या दृष्टीने यंदाचे नियोजन पूर्ण झाले आहे. शहरातील दि.बा.पाटील विद्यालयात पहिले ते पाचवी वर्ग सुरू करण्याचे नियोजन केले आहे तसेच बदलत्या काळाप्रमाणे महापालिकेच्या प्राथमिक शाळांमध्येही ई-लर्निंगची सुविधा महापालिका देणार आहे, तर जिल्हा परिषदेकडून हस्तांतरीत झालेल्या शाळांचे नूतनीकरण व पुनर्बांधणी यासाठी १३५ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.*

## माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांचे निधन

### शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, लोकसभेचे माजी अध्यक्ष आणि शिवसेनेचे ज्येष्ठ नेते डॉ. मनोहर जोशी यांचे शुक्रवारी (दि.२३) पहाटे निधन झाले. ते ८७ वर्षांचे होते. दोन दिवसांपूर्वी हृदयविकाराचा झटका आल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतला. दादर येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले.

राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार आदींनी माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करून श्रद्धांजली वाहिली. (पान २ वर..)



**रायगडात जन्म आणि शिक्षण**

मनोहर जोशी यांचा जन्म २ डिसेंबर १९३७ रोजी रायगड जिल्ह्यातील नांदवी (ता. माणगाव) या छोट्याशा गावात झाले. त्याचे शिक्षण चौथीपर्यंत नांदवीला, पाचवी महाडला, तर सहावीनंतर पनवेलला झाले. महाविद्यालयीन शिक्षणानिमित्त ते मुंबईला गेले व स्थायिक झाले.

## भाजप आमदार राजेंद्र पाटणी यांचे निधन



**वाशिम : प्रतिनिधी**

वाशिम जिल्ह्यातील कारंजा विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार राजेंद्र पाटणी यांचे दीर्घ आजारामुळे शुक्रवारी (दि.२३) निधन झाले. ५९ वर्षीय पाटणी यांच्यावर मुंबईमध्ये उपचार सुरू होते. अखेर त्यांची प्राणज्योत मालवली.

आमदार राजेंद्र पाटणी हे वाशिम जिल्ह्यातील भाजपचे अभ्यासू नेते होते. पाटणी यांनी शिवसेनेकडून विधान परिषद सदस्य आणि विधानसभा सदस्य म्हणून काम केले होते. २०१४मध्ये त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आणि भाजपकडूनदेखील ते कारंजा-मानोरा मतदारसंघातूम निवडून आले होते.

आमदार राजेंद्र पाटणी यांच्या निधनाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शोक व्यक्त केला आहे. एक्स अकाउंटवर पोस्ट टाकून त्यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

## निवडक

### राहुल गांधी, सिद्धरामय्या, शिवकुमारांना कोर्टाचे समन्स

**बंगळुरू** : कर्नाटक विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने तत्कालीन भाजप सरकारवर केलेल्या कमिशनच्या आरोपप्रकरणी विशेष एमपी, एमएलए कोर्टाने खासदार राहुल गांधी, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांना समन्स बजावले आहे. येत्या २८ मार्च रोजी या तिन्ही नेत्यांनी न्यायालयात हजर राहावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

### काश्मिरी तरुणीने सुनावले पाकिस्तानला खडे बोल

**लंडन** : भारताविरोधात प्रपोगंडा चालवणाऱ्या पाकिस्तानला पुन्हा एकदा जगासमोर खडे बोल ऐकावे लागले आहेत. काश्मीरमध्ये राहणारी पत्रकार याना मीरने पाकिस्तानला आरसा दाखवला आहे. भारताविरोधात प्रपोगंडा चालवल्याबद्दल तिने पाकिस्तानला सुनावले. ती ब्रिटनच्या संसदेत बोलत होती. या वेळी तिने भारतीय सैन्याचे कौतुकही केले. यानंतर यानाच्या वक्तव्याचा व्हिडीओ देशभरात व्हायरल होत आहे.

# भारतात यापुढे विकासावर आधारित समृद्ध रामराज्य

## केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांचे खारघरमध्ये प्रतिपादन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या काळात भारत वेगाने दौडत आहे. भारताकडे विश्वाचे लक्ष लागलंय. देशात सांस्कृतिक पुनोरूद्धार सुरू आहे. भगवान रामाचे आगमन झाल्याने निश्चित आगामी काळ रामराज्याचा असणार असून विकासावर आधारित समृद्ध रामराज्य असणार आहे, असे प्रतिपादन केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी शुक्रवारी (दि.२३) खारघर येथे केले.

अखिल जागतिक गायत्री परिवाराच्या वतीने खारघरमधील कॉर्पोरेट पार्क या ठिकाणी आयोजित पाच दिवसीय मुंबई अश्वमेध महायज्ञ कार्यक्रमास केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी भेट दिली. त्या वेळी ते बोलत होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री मंगल प्रभात लोढा, खासदार श्रीरंग बारणे, गायत्री परिवारातील अश्वमेध महायज्ञाचे प्रमुख डॉ. चिन्मय पांड्या तसेच गायत्री परिवारातील असंख्य सदस्य उपस्थित होते.

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विजयी अश्व कुणीही अडवू शकत नाही -मुख्यमंत्री

भारतीय संस्कृतीची पुनर्स्थापना करून तिचा प्रचार आणि प्रसार नव्या पिढीमध्ये रूजवण्यासाठी या अश्वमेध महायज्ञाचे आयोजन करण्यात आले असून यासाठी महाराष्ट्राच्या भूमीची निवड केल्याबद्दल गायत्री परिवाराचे या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विशेष आभार मानले तसेच पूर्वी जो राजा हा यज्ञ करीत असे त्याचा अश्व जिथपर्यंत जाईल तिथपर्यंत तो अजेय ठरवला जाई. आज हा यज्ञ केल्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विजयी अश्व कुणीही अडवू शकणार नाही. ते यापुढेही अजेय राहतील, असा विश्वास व्यक्त केला.

## पुण्यात आजपासून 'डिफेन्स एक्स्पो'

**पुणे : प्रतिनिधी**

भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भर भारताच्या वाटचालीला आणखी बळकटी देण्यासाठी राज्य शासनाच्या उद्योग विभागामार्फत महाराष्ट्रातील संरक्षण साहित्य उत्पादन करणाऱ्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राला चालना देण्याच्या उद्देशाने २४ ते २६ फेब्रुवारीदरम्यान महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पोचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यातील मोशी येथे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि कन्व्हेन्शन सेंटर येथे हा एक्स्पो होत आहे.

विशेष म्हणजे संरक्षण उत्पादन क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना सक्षम करणारा महाराष्ट्रातील या प्रकारातील हा पहिलाच डिफेन्स एक्स्पो आहे. संरक्षण उत्पादन क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्राविण्य असणाऱ्या उद्योगातील समन्वयाला चालना देण्याच्या उद्देशाने वायुसेना, नौसेना आणि स्थलसेना या तीनही सुरक्षा दलांचा यात महत्त्वाचा सहभाग असणार आहे.

# पनवेल कोळीवाड्याला नवी झळाळी

## आई एकविरा मातेचे तैलचित्र, सभामंडप, सेल्फी पॉईंटचा शुभारंभ







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आई एकविरा मातेचे तैलचित्र, सेल्फी पॉईंट आणि सभामंडप पनवेल कोळीवाड्याची शान आहे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी गुरुवारी (दि.२२) या शुभारंभावेळी काढले; तर महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पनवेल कोळीवाड्यासाठी आणखी एक मच्छी मार्केट उभारून स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल, असे नमूद केले.

पनवेल महापालिकेच्या निधीतून कोळीवाड्यात आई जरीमरी खुला सभामंडप तसेच श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे आई एकविरा मातेचे तैलचित्र आणि सेल्फी पॉईंट उभारण्यात आला आहे. ही कामे मार्गी लागण्यासाठी माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. या कामांचा शानदार शुभारंभ सोहळा गुरुवारी झाला.

या वेळी सेल्फी पॉईंटचे उद्घाटन आणि सभामंडपाचे लोकार्पण आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते, तर आई एकविरा मातेच्या तैलचित्राचे अनावरण माजी उपमहापौर सीताताई पाटील यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमास भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, राजू सोनी, अजय बहिरा, मुकीत काझी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, शहर खजिनदार संजय जैन, प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी, अर्चना ठाकूर, मयुरेश खिस्मतराव, युव मोर्चा शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, कोळीवाड्यातील हारू भगत, कोळी समाजाचे अध्यक्ष विश्वानाथ कोळी यांच्यासह पदाधिकारी आणि कोळी बांधव, भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**सातारा : अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता यांचे उच्चाटन करण्यासाठी तळमळीने कार्य करणारे थोर संत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी कॉलेज येथे संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिवादन केले. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, हुपरी (जि. कोल्हापूर) येथील चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे कॉलेजचे प्राचार्य डॉ. दत्तात्रेय भोसले उपस्थित होते.**

# एसटीच्या आवडेल तेथे प्रवास योजनेला पसंती

## वर्षभरात मिळाले १४ कोटींचे उत्पन्न

**मुंबई : प्रतिनिधी**

आवडेल तेथे प्रवास या योजनेला राज्यात सर्वत्र पसंती मिळत आहे. या योजनेचा फायदा गेल्यावर्षी लाखभर प्रवाशांनी घेतल्याची माहिती एसटी अधिकाऱ्यांनी दिली आहे.

राज्यभरात छोटे व्यापारी, उद्योजक, छोटे विक्रेते अशा अनेकांना कामांनिमित्त सलग काही दिवस एसटीचा प्रवास करावा लागतो. अनेक हौशी पर्यटक आठवड्याची सुट्टी घेऊन मनसोक्त भ्रमंती करतात. अशा प्रवाशांसाठी असलेल्या आवडेल तेथे प्रवास या योजनेला प्रवाशांचा उदंड प्रतिसाद लाभला आहे. यंदाच्या नऊ महिन्यात तब्बल ८० हजार प्रवाशांनी प्रवास केला आहे.



राज्य मार्ग परिवहन महामंडळाने १९८८मध्ये दहा दिवसांसाठी पास देत आवडेल तेथे प्रवास योजना सुरू केली. एप्रिल २००६मध्ये योजनेची पुनर्रचना करीत दहा दिवस पास रद्द करून त्यात चार दिवस आणि सात दिवस या पासचा समावेश करण्यात आला.

शहर वाहतुकीसह राज्यांतर्गत आणि आंतरराज्य वाहतुकीत एसटी ज्या ठिकाणी पोहचते, अशा सर्व ठिकाणांपर्यंत या पासची वैधता आहे. पासधारकांना आरक्षण करून प्रवासाची मुभा आहे. यासाठी स्वतंत्र आरक्षण शुल्क भरावे लागते. पासधारकांमध्ये तीर्थक्षेत्रांसह, पर्यटन स्थळांकडे विशेष भर आहे.

जत्रा-यात्रा उत्सवांसह सलग सूट्ट्यांच्या काळात या पासची मागणी वाढत आहे, असे एसटीतील अधिकाऱ्यांनी सांगितले. गेल्या आर्थिक वर्षात (१ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३) एक लाख लोकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. या योजनेंतर्गत महामंडळाला १४ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे, असे एसटीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

या योजनेच्या सहाय्याने राज्यातील प्रवाशांच्या पैशांची बचत होईल. पासधारकास आंतरराज्य मार्गावर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बस जेथपर्यंत जाते तिथपर्यंत राज्य परिवहन बसने प्रवास करता येईल. या योजनेंतर्गत प्रवाशांना एसटीच्या सर्व बसेस साधी, जलद, रात्रसेवा, शहरी व यशवंती (मिडी), शिवशाही (आसनी)ने प्रवास करता येतो. या योजनेचा सर्वांत जास्त ग्रामीण भागातील नागरिकांना झाला आहे. त्यामुळे एसटीच्या उत्पन्नातही वाढ झाली आहे.

# मुंबईत आजपासून बौद्ध महोत्सव आणि शबरी महोत्सव

**मुंबई : प्रतिनिधी**

देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त महासंस्कृती महोत्सव २०२४ अंतर्गत राज्यभर विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या संकल्पनेतून मुंबई उपनगर जिल्ह्यात बौद्ध महोत्सव हा २४ आणि २५ फेब्रुवारी रोजी आणि शबरी महोत्सव २७ आणि २८ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आला आहे. पालकमंत्री लोढा यांनी मंत्रालयात विधिमंडळ वार्ताहर कक्ष येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

डॉ. भदंत राहुल बोधी, सामाजिक कार्यकर्ते शरद कांबळे, नितीन मोरे, अरविंद निकाळजे देखील या वेळी उपस्थित होते. सर्वोदय महाबुद्ध विहार, टिळक नगर, चेंबूर येथे बुद्ध महोत्सव आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम २४ आणि २५ फेब्रुवारी रोजी होणार असून, त्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले आणि डॉ. भदंत राहुल बोधी यांची विशेष उपस्थिती असणार आहे. हा कार्यक्रम भिक्खू संघ युनायटेड बुद्धिस्ट मिशनच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेला आहे.

मंत्री श्री.लोढा म्हणाले, आपल्या भूमीला भगवान गौतम बुद्धांच्या विचारांचा अमोघ वारसा आहे. त्याचप्रमाणे आदिवासी बांधवांच्या संस्कृतीची देणगी आहे. प्रगतीच्या मार्गावर सर्वांना सोबत घेऊन पुढे जायचे असेल, तर आपला वारसा आणि संस्कृती जपणे अतिशय महत्त्वाचे ठरते. त्याच अनुषंगाने आम्ही या महोत्सवाचे आयोजन केले आहे. बौद्ध बांधवांनी आणि आदिवासी बांधवांनी नेहमीच आपल्या योगदानाने समाजाच्या प्रगतीसाठी महत्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या कार्याचा गौरव करण्याची ही संधी असून, जास्तीत जास्त नागरिकांनी या महोत्सवामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन मंत्री लोढा यांनी केले.

शनिवारी (दि. २४) सकाळी १० वाजता केंद्रीय मंत्री रामदास आठवले, पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, डॉ. भदंत राहुल बोधी यांच्यासह विविध मान्यवरांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे उद्घाटन होईल. त्यानंतर भीम गीते स्पर्धा, परिसंवाद, संविधान रॅली, धम्मपद भीम गीते यासारख्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण होईल. २५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता कार्यक्रमाची सुरुवात होणार असून, या दिवशी सामाजिक संस्था परिचय, कला अविष्कार, महिला मेळावा, धम्म सन्मान आणि शाहीर जलसा असे कार्यक्रम होतील.

याचप्रमाणे २७ आणि २८ फेब्रुवारी रोजी गोरेगाव (पू.) येथील आरे कॉलनीमधील आदर्श नगर येथे शबरी महोत्सवाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमात आदिवासी संस्कृतीचे विविध पैलू उलगडले जातील. त्यासाठी प्रदर्शने, वैदू संमेलन, जनजागृतीपर नृत्यांचे सादरीकरण, जनजाती पूजा मांडणी, महिला संमेलन यासारख्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. हा कार्यक्रम वनवासी कल्याण आश्रमाच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेला आहे.

पान १ वरुन

## पनवेल मनपाचा महिला सशक्तीकरणावर भर

**आरोग्य संवर्धन** : ✻ महिलांकरिता व्यायामशाळा उभारणे. प्रति प्रभाग समिती किमान एक सुसज्य महिला व्यायामशाळा उभारणे. ✻ महिलांसाठी योगा व प्राणायामाचे प्रशिक्षण देणे. ३. मुलींसाठी महिलांसाठी अत्याधुनिक स्वच्छतागृह (पिंक टॉयलेट) बांधणे व दुरुस्ती करणे.

**जाणीव जागृती** : ✻ काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांसाठी/विशेष मुलांच्या गतिमंद (वयोगट ० ते १६ वयोवर्ष) उपचारासाठी व देखभाली मासिक अर्थसहाय्य करणे. (पिवळे/केशरी रेशनकार्डधारक) ✻ किशोरवयीन मुलींना लैंगिक शिक्षण मासिक पाळी व आरोग्यविषयक जनजागृती करणे/लेक्चर्स आयोजित करणे. ✻ महिलांसाठी/मुलींसाठी समुपदेशन केंद्र/हेल्पलाइन/विधी सल्ला केंद्र चालवणे. ✻ बाल कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम/लेक्चर्स आयोजित करणे.

**स्वयंरोजगार** : ऑटो रिक्षा (पिंक रिक्षा योजना)करिता प्रशिक्षण/अर्थसहाय्य देणे. रिक्षेच्या कर्जावरील व्याजाची रक्कम महापालिकेमार्फत अदा करण्यात येईल.

**कौशल्य** : ✻ मुलींना, महिलांना व बचत गटातील महिलांना व्यावसायिक रिटेल मॅनेजमेंटचे प्रशिक्षण देणे. एमएस ऑफिस, अकाउंटींग, टायपिंग (इंग्लिश/मराठी) ✻ मुलींना, महिलांना व बचत गटातील महिलांना ॲडव्हान फॅशन डिझायनिंग प्रशिक्षण देणे. ✻ असंघटित महिलांना लघुउद्योगकाचे (घरघंटी/पापड मशीन/मिरची कांडप मशीन मसाला ग्राइंडर/शेवया मशीन) प्रशिक्षण देणे. ✻ व्यक्तिमत्व विकास कार्यक्रम राबवणे. उदा. संभाषण, कौशल्य, सभाधिटपणा सूत्रसंचालन इत्यादी इव्हेंट मॅनेजमेंटचे प्रशिक्षण देणे.

**क्रीडाविषयक** : ✻ मुली व महिला खेळाडूंकरिता राज्यस्तर/राष्ट्रीयस्तर/आंतरराष्ट्रीय खेळासाठी गुणवत्ता प्राप्त खेळाडूंकरिता बक्षीस/शिष्यवृत्ती देणे.

**ज्येष्ठांसाठी** : ✻ ज्येष्ठ नागरिकांसाठी १० ते १२ विरंगुळा केंद्र अद्यावत करण्यात येणार असून त्यांचे संचालन ज्येष्ठ नागरिकांकडेच असेल. याशिवाय एनएमएमटीच्या बसमध्ये ५० टक्के सवलत होती, ती १०० टक्के करण्यात येणार आहे.

**बांधकाम विभाग** : ✻ महापालिका क्षेत्रातील रस्ते दुरूस्ती काँक्रीटीकरण व डांबरीकरण व इतर सुविधांसाठी ५७० कोटी रुपयांचा निधी या अर्थसंकल्पात मंजूर करण्यात आला आहे तसेच स्वराज्य या नवीन प्रशासकीय इमारतीसाठी २३४ कोटी, महापौर निवासस्थानासाठी १४५ कोटी व नवीन प्रभाग कार्यालयांसाठी ३८ कोटींचा निधी शिल्लक ठेवण्यात आला आहे. प्राथमिक शाळा व माता व बालसंगोपन रुग्णालय बांधकाम ५६ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

**सीसीटीव्हीसाठी व्यवस्था** : ✻ महापालिका कार्यक्षेत्रातील महिलांची सुरक्षा तसेच एकूणच सुरक्षा वाढविण्याच्या दृष्टीने या अर्थसंकल्पात १६५ कोटींची भरीव तरतूद पालिकेने केली. आहे.

**शाळांविषयक** : ✻ महापालिकेच्या शाळा खासगी शाळेप्रमाणे चांगल्या बनवणार. इंग्रजी माध्यमाच्या शाळेसाठी त्यासाठी आयटी नावाच्या संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे. त्यामुळे सामन्यांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळेल. कामोठे व तळोजा येथील शाळा या वर्षी सुरू होतील. महापालिकेत सामाविष्ट झालेल्या २९ गावांतील ५२ शाळा दुरूस्त करून महापालिकेकडे हस्तांतरण करून ताब्यात घेण्यात येणार आहेत.

**वैद्यकीय सेवा** : ✻ महापालिकेने मागील अर्थसंकल्प हा वैद्यकीय सेवांच्या बळकटीकरणावर भर देणारा बनविला होता. त्याप्रमाणे पालिकेने १४ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र, पाच आरोग्यवर्धिनी केंद्र व एक आपला दवाखान्याची उभारणी केली आहे. या वर्षीदेखील महापालिकेने वैद्यकीय सेवा व आरोग्यविषयक कार्यक्रम तसेच अकस्मित कारणांसाठी ९८ कोटींची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे.

**पाणीपुरवठा व पायाभूत सुविधा** : ✻ पाणीपुरवठा व्यवस्थेसाठी १४१ कोटी व शासन पुरस्कृत अमृत २.० अंतर्गत १४५ कोटी रुपयांचा निधी या अर्थसंकल्पात राखीव ठेवण्यात आला आहे. स्वच्छ भारत योजनतेंर्गत १८ कोटींचा निधी राखीव आहे. बाग व उद्याने यांच्या विकासाकरिता ११० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. क्रीडांगणांच्या विकासासाठी २१ कोटींची भरीव रक्कम मंजूर करण्यात आली आहे.

**झोपडपट्ट्यांचा पुनर्विकास** : ✻ शहर झोपडपट्टी मुक्त व्हावे या हेतूने पंतप्रधान आवास योजेंतर्गत झोपडपट्टी पुर्नविकासाठी २०० कोटींच्या भरीव निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

**घनकचरा संकलन** : ✻ शहर सुशोभिकरणाबरोबरच घनकचरा संकलन व त्यासाठी लागणारी सामुग्री, वाहने, मनुष्यबळ यासाठी १४९ कोटींची तरतूद या अर्थसंकल्पात केली आहे. भुयारी गटार व मलनिस्सारण विभागासाठी १७२ कोटींची तरतूद आहे.


आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, रस्ते अशा गुणवत्तापूर्ण पायाभूत सोयीसुविधांबरोबरच शहर सुशोभीकरण, झोपडपट्टी पुनर्विकास अशा महत्त्वाच्या गोष्टीचांही या अंदाजपत्रकात अंतर्भूत करण्यात आल्या असून नागरिकांच्या गरजा ओळखून विकासामुख आणि लोकाभिमुख कोणतीही दरवाढ नसलेला असा पालिकेचा अर्थसंकल्पात तयार करण्यात आला आहे.

**पनवेल महानगरपालिका**

**सन २०२३-२४ चे सुधारित व २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रक**

जमेच्या अंदाजानुसार रुपया कसा येईल याचा तपशील

| जमा बाजू | रु. (लाखात) | १ रुपयातील (पैसे) |
|---|---|---|
| आरंभिची शिल्लक | 125856.29 | 31 पैसे |
| मनपा दर व कर (चालू मागणी) | 24813.11 | 6 पैसे |
| मनपा दर व कर (थकबाकी) | 116331.63 | 29 पैसे |
| करेत्तर महसूल - शास्ती व शुल्क | 19500.80 | 5 पैसे |
| वस्तू व सेवा कर अनुदान | 46967.04 | 12 पैसे |
| १% मुद्रांक शुल्क अनुदान | 3000.00 | 1 पैसे |
| १५ वा वित्त आयोग अनुदान | 2600.00 | 1 पैसे |
| झोपडपट्टी सुधारणा (PMAY) | 20000.00 | 5 पैसे |
| अमृत -२ पाणीपुरवठा योजना | 14505.00 | 4 पैसे |
| विविध शासकीय अनुदाने | 12832.65 | 3 पैसे |
| इतर संकीर्ण व व्याजा पोटी रक्कमा | 6000.00 | 1 पैसे |
| शासकीय परतावा | 6793.40 | 2 पैसे |
| **एकुण** | **399199.92** | **100 पैसे** |



**पनवेल महानगरपालिका**

**सन २०२३-२४ चे सुधारित व २०२४-२५ चे मुळ अंदाजपत्रक**

खर्चाच्या अंदाजानुसार रुपया कसा जाईल याचा तपशील

| खर्च बाजू | रु. (लाखात) | १ रुपयातील (पैसे) |
|---|---|---|
| सभाकामकाज व आस्थापनावरील खर्च | 14026.20 | 5 पैसे |
| बांधकाम | 133679.01 | 33 पैसे |
| अनुदानातील भांडवली कामे | 49368.65 | 12 पैसे |
| घनकचरा व्यवस्थापन | 19466.00 | 5 पैसे |
| शासन निकषानुसार राखीव निधी | 5595.00 | 1 पैसे |
| शिक्षण | 13561.00 | 3 पैसे |
| अग्निशमन सेवा | 5687.00 | 1 पैसे |
| वैद्यकीय व आरोग्य सेवा | 8209.57 | 2 पैसे |
| पथप्रकाश व उद्याने | 20297.00 | 5 पैसे |
| जलनि:सारण/मलनि:सारण | 17287.00 | 4 पैसे |
| पाणीपुरवठा | 14117.50 | 4 पैसे |
| निवडणूक | 3000.00 | 1 पैसे |
| झोपडपट्टी सुधारणा (PMAY) | 20000.00 | 5 पैसे |
| सिडको भुखंड हस्तांतरण | 8000.00 | 2 पैसे |
| शासकीय परतावा | 39121.75 | 10 पैसे |
| इतर विभागांतर्गत खर्च | 27784.24 | 7 पैसे |
| अखेर शिल्लकेसह एकुण | **399199.92** | 100 **पैसे** |



# ड्राय वेस्ट बँक उपक्रमात ३००हून अधिक विद्यार्थ्यांचा सन्मान



**नवी मुंबई : बातमीदार**

संत गाडगेबाबा जयंतीचे औचित्य साधून शुक्रवारी (दि. २३) घनकचरा व्यवस्थापन विभाग तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियान कक्ष यांच्या माध्यमातून ड्राय वेस्ट बँक उपक्रमात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत शालेय विद्यार्थी आपल्या घरातून टेट्रापॅक, बॉटल, चॉकलेट व गोळ्यांचे रॅपर, सॅशे इत्यादी कचरा सुक्या कचऱ्यात न टाकता शाळेत घेऊन येतात. शाळेमध्ये विद्यार्थ्यांनी जमा केलेल्या सुक्या कचऱ्याच्या प्रमाणात त्यांना पॉईंटस् देण्यात येतात व सर्वाधिक पॉईंटस् जमविणाऱ्या विदयार्थ्यांना बक्षिस स्वरुपात शालेय साहित्य प्रदान करून सन्मानित केले जाते. याकरिता शिक्षकांकडे उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे स्वच्छता पासबूक देण्यात आलेले असून त्यामध्ये विद्यार्थ्याने जमा केलेल्या सुक्या कचऱ्याच्या तुलनेत पॉईंट्सची नोंद केली जाते.

बेलापूर, नेरुळ, वाशी या तीन विभागातील १५ शाळांमध्ये राबविला जाणारा हा उपक्रम सर्वच शाळांमध्ये टप्प्याटप्प्याने राबविण्याचे नियोजन आहे. या १५ शाळांमधील २७७१ विद्यार्थी या उपक्रमात सहभागी असून यामधील ३०० हून अधिक सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना बेलापूर येथील विशेष कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले.

सीबीडी बेलापूर येथील वारकरी भवनमध्ये झालेल्या ड्राय वेस्ट बँक उपक्रमाच्या पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त तथा स्वच्छ भारत मिशनचे नमुंमपा नोडल अधिकारी डॉ. बाबासाहेब राजळे यांनी उत्तम कामगिरी करुन पारितोषिकाचे मानकरी ठरलेल्या विदयार्थ्यांचे कौतुक करीत या उपक्रमातील आपले चांगले काम इतर विद्यार्थ्यांना प्रेरणादायी ठरेल, असे सांगितले.

पारितोषिक स्वरुपात वितरण केलेले शैक्षणिक साहित्य सुर्योदय फायनान्स बँक यांच्या सीएसआर निधीमधून उपलब्ध करण्यात आला.

## वडगावमध्ये आई गावदेवी भवानी माता उत्सव

**मोहोपाडा** : वडगावमध्ये आई गावदेवी भवानी मातेची मूर्तीची दोन वर्षांपूर्वी प्राणप्रतिष्ठापणा करण्यात आली होती. याठिकाणी द्वितीय वर्धापनदिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

सलग दोन दिवस हा कार्यक्रम सुरू असून यामध्ये धार्मिक विधींसमवेत महाप्रसादाचा लाभ आलेल्या भक्तगणाने घेतला. सामुदायिक काकडा, श्री दुर्गा सप्तशृंती पाठ वाचन, भजन, तसेच देवीचे गाणी समवेत पुण्यवाचन, ब्रम्हादी मंडळ, मुख्यदेवता नवग्रह स्थापन, पुजन हवन, देवीची पालखी संपूर्ण गावामध्ये फिरविण्यात आली. ज्ञानाई हरिपाठ महिला मंडळ आसरोटी यांनी केले. कैलास महाराज पवार (मंगळवेढा पंढरपूर), हभप नागेश्वरी ताई झाडे आळंदी यांनी कीर्तन केले.

# दिमाखदार सोहळ्यात राज्य चित्रपट पुरस्कारांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण

**मुंबई : प्रतिनिधी**

सांस्कृतिक कार्यक्रमांची मेजवानी, कार्यक्रमांच्या प्रारंभीच सादर झालेली गणेश वंदना आणि शिवराज्याभिषेक वर्षाच्या पार्श्वभूमीवर सादर झालेल्या कार्यक्रमांनी ५७व्या राज्य मराठी चित्रपट पुरस्कार सोहळ्यात चांगलीच रंगत भरली.



या वेळी दादासाहेब फाळके सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा मान 'वाय' या चित्रपटाने मिळविला. या चित्रपटाचे दिग्दर्शक अजित वाडीकर यांना भालजी पेंढारकर सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक म्हणून गौरविण्यात आले. बाबा चित्रपटातील भूमिकेसाठी दीपक डोब्रियाल यास उत्कृष्ट अभिनेता तर मिस यू मिस्टरमधील भूमिकेसाठी मृण्मयी देशपांडे हिला उत्कृष्ट अभिनेत्री पुरस्कार मिळाला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या पुरस्कारांचे वितरण झाले.

या वेळी सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, आमदार ॲड. मनीषा कायंदे, किरण शांताराम, जब्बार पटेल, सचिन पिळगावकर, महेश कोठारे, महेश मांजरेकर आदींसह चित्रनाट्यसृष्टीतील अनेक नामवंत उपस्थित होते.

गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ पार्श्वगायक सुरेश वाडकर, राज कपूर जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कार, चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कारही प्रदान करण्यात आले. सर्वांचे अभिनंदन होत आहे.

# पॉवरपॉइंट प्रेझेंटेशन स्पर्धेत हर्षदा चव्हाण प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालय येथील बिझनेस लॉ ग्रुपमधील एलएलएम द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी हर्षदा रवींद्र चव्हाण हिने शेठ हिराचंद मुठा आर्ट्स, कॉमर्स सायन्स महाविद्यालय कल्याण येथे आयोजित पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

तिच्या या विजयामुळे केवळ तिच्या नावाचाच सन्मान झाला नाही ,तर भागुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉची प्रतिष्ठाही उंचावली आहे. हर्षदाचा विजय भागुबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयामध्ये दिल्या जाणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता अधोरेखित करतो. प्रभारी प्राचार्य सानवी देशमुख आणि वक्तृत्व कौशल्य समितीचे अध्यक्ष धनश्री योगेश कदम यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना येथे मिळत आहे.



## दुखवटा

### रमेश आंग्रे



**नवीन पनवेल :** पनवेल येथे राहणारे रमेश (नाना) आंग्रे (७५) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर अमरधाम स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, नातू असा परिवार आहे. त्यांच्या अंत्यसंस्काराला पंचक्रोशीतील अनेक नागरिक उपस्थित होते.

### रमेजा जमादार



**माणगाव** : येथील आदर्श शिक्षिका सायराबानू वजीर चौगुले यांच्या मातोश्री रमेजा अजीज जमादार यांचे १८ फेब्रुवारी रोजी राहते घरी सांगली येथे निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६७ होते. त्यांच्या पश्चात पती, दोन मुली, एक मुलगा, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने जमादार व चौगुले कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे. पै. रमेजा जमादार यांच्यावर बहे गावातील कब्रस्थानात दफनविधी करण्यात आला. त्यावेळी अंत्यविधीला मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

## माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांचे निधन

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विश्वासू अशी मनोहर जोशी यांची ओळख होती. शिवसेनेकडून विधान परिषदेवर निवडून येत त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. जोशी यांनी मुंबईचे महापौरपदही भूषविले. राज्यात १९९५मध्ये शिवसेना-भाजप युतीचे सरकार सत्तेत आल्यावर बाळासाहेबांनी जोशी सरांवर मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी सोपवली. पुढे केंद्रीय मंत्री, लोकसभा अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. मागील काही काळापासून प्रकृतीच्या कारणास्तव ते सक्रिय राजकारणापासून दूर होते.

# पनवेलच्या नेरे येथील विद्युत समस्या मार्गी

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सबस्टेशन कामाचे भूमिपूजन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ग्रामस्थांना जास्तीत जास्त सुविधा देण्याची जबाबदारी आपला आमदार म्हणून माझी आहे. त्या दृष्टीकोनातूनच मी काम करीत आहे. यापुढेही विविध सुविधा या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येतील, अशी ग्वाही भाजपचे मावळ लोकसभा मतदारसंघ प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी नेरे येथे सबस्टेशनच्या कामाच्या भूमिपूजनावेळी दिली.

नेरे येथील महालक्ष्मी नगरमध्ये सन २०१३पासून प्रलंबित असलेल्या विद्युत सबस्टेशनचे काम आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे सुरू झाले आहे. एमएसईबीच्या माध्यमातून करण्यात येणाऱ्या या सबस्टेशनच्या कामाचे भूमिपूजन भाजपचे मावळ लोकसभा मतदारसंघ प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि.२२) झाले. या सबस्टेशनमुळे ७० गावे आणि २० आदिवासीवाडी वस्तींवर वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा नवीन उपकेंद्रातून जाणाऱ्या तीन वाहिन्यांमुळे सुरळीत होण्यास मदत होणार असल्याची माहिती त्यांनी या वेळी दिली, तसेच डिसेंबर २०२४पर्यंत काम पूर्ण करण्याच्या सूचना आमदार प्रशांत ठाकूर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

भूमिपूजनावेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, महावितरण कंपनीतर्फे वाशी मंडळ कार्यालयाचे अधीक्षक अभियंता सिंहाजीराव गायकवाड, मंदार अत्रे, शहर विभाग कार्यालयाचे कार्यकारी अभियंता सतीश सरोदे, पनवेल १ उपविभाग भिंगारी येथील अतिरिक्त कार्यकारी अभियंता देवीदास बैकर, स्थापत्य विभागाचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता काळे, नेरे विभागीय अध्यक्ष सुनील पाटील, नेरे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रकाश घाडगे, उपसरपंच वंदना रोडपालकर, ग्रामपंचायत सदस्य राम पाटील, कल्पना वाघे, निलेश पाटील, डॉ. रोशन पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष महादू पाटील, माजी सरपंच वासुदेव गवते यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आाणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# श्रुती घोडकेचा लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सत्कार

## पालकांचेही विविध मान्यवरांकडून अभिनंदन





**कामोठे : रामप्रहर वृत्त**

श्रुती संजीवनी संदीप घोडके या रयत सेवकांच्या मुलीला इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, इंदोर या नामांकित संस्थेत गेट परीक्षा उच्च श्रेणीत उत्तीर्ण झाल्याने श्रुती घोडकेचा प्रतिनिधिक सत्कार रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या रयत सेवक बँकेच्या माध्यमातून करण्यात आला. श्रुती घोडकेचे पालक संदिप घोडके व संजीवनी घोडके यांनी हा सत्कार स्वीकारला.

श्रुती घोडके हिचा यापूर्वीसुद्धा रयत बँकेने दहावी परीक्षेत ९६ टक्के गुण मिळवल्याबद्दल पुणे येथे तसेच तिचा भाऊ अथर्व घोडके याने बारावी परीक्षेत ९४ टक्के गुण मिळवल्याबद्दल पनवेल येथे सन्मान केला आहे. या कार्यक्रमात व्यासपीठावर संस्थेचे माजी सचिव डॉ. जे. जी. जाधव, सध्याचे सहसचिव बंडू पवार, वाशी शाखेचे चेअरमन किशोर पाटील यांनी श्रुती घोडके हिचे वडील प्रा. डॉ. संदीप घोडके व आई संजीवनी घोडके यांचे अभिनंदन केले.

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा उपक्रम

# जासई हायस्कूल तालुकास्तरावर प्रथम



**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील जासई येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज, दहागाव या शाळेने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमात तालुक्यात प्रथम क्रमांक पटकाविला.

गटशिक्षणाधिकारी प्रियांका पाटील व त्यांच्या पथकाने विद्यालयाचे परीक्षण केले. या विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी राबविलेले वेगवेगळे उपक्रम, स्वच्छता, विद्यार्थ्यांची गुणवत्ता, पर्यावरण संवर्धन, पालकांचा सहभाग, समाजाचे योगदान या अनेक मुद्द्यांवर विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हे विद्यालय नेहमीच प्रयत्नशील असते. विद्यालयाचे शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष सुरेश पाटील, चेअरमन अरुण जगे, ज्येष्ठ स्कूल कमिटी सदस्य नरेश घरत, तसेच स्थानिक स्कूल कमिटी, पालक शिक्षक संघ, माता पालक संघ यांचे नेहमीच सहकार्य व मार्गदर्शन मिळत असते. विद्यालयाचे मुख्याध्यापक व रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग हे सर्व सेवकांना बरोबर घेऊन उत्कृष्ट मार्गदर्शन करून शाळेच्या प्रगतीसाठी सतत प्रयत्नशील असतात.

विद्यालयाच्या उपमुख्याध्यापिका एस. एस. पाटील, रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक व दि रयत सेवक को. ऑपरेटिव्ह बँक साताराचे माजी व्हाईस चेअरमन नुरा शेख यांचेही या पारितोषिक प्राप्तीत मोलाचे सहकार्य आहे.

विद्यालयाच्या शिक्षिका एम. डी. म्हात्रे, एस. सी. पाटील व इतर सर्व सेवकांनी शाळेच्या विविध उपक्रमांचे यशस्वी सादरीकरण केले.

# सिडको उपाध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालकपदी विजय सिंघल



**पनवेल : सिडको वृत्तसेवा**

सिडको महामंडळाच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालकपदाची सूत्रे विजय सिंघल यांनी शुक्रवारी (दि.२३) मावळते उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिल डिग्गीकर यांच्याकडून स्वीकारली.

विजय सिंघल हे १९९७ चया तुकडीतील भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस) अधिकारी आहेत. त्यांनी ठाणे महापालिकेचे आयुक्त, बृहन्मुंबई महापालिकेचे उपायुक्त, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक ही पदे भूषविली आहेत. सिडकोच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक पदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी विजय सिंघल हे बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमाचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होते.

विजय सिंघल यांना उत्कृष्ट लोक प्रशासनाकरीता पंतप्रधान पुरस्कार, बृहन्मुंबई महापालिकेत केलेल्या तंत्रज्ञानाच्या उत्कृष्ट वापरासाठी भारत सरकारतर्फे डिजिटल इंडिया अवॉर्ड पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

# उरण नगर परिषदेची गॅसदाहिनी महिनाभरात सुरू होणार



**उरण : वार्ताहर**

उरण नगर परिषदेच्या माध्यमातून येथील नागरिकांच्या सोयीसाठी व पर्यावरण रक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन शहरातील बोरी स्मशानभूमीत गॅसवर आधारित शवदहिनीची बांधकाम पूर्ण झाले असून महिनाभरात ही गॅसदाहिनी सुरू करण्यात येईल, अशी माहिती मुख्याधिकारी समीर जाधव यांनी दिली आहे.

गॅस कनेक्शनसाठी नगर परिषदेतून महानगर गॅस कंपनीकडे प्रस्ताव देण्यात आला आहे. कंपनीने कनेक्शन देण्यासाठी बोरी स्मशानभूमीपर्यंत गॅसची पाईपलाईन टाकण्याचा परवाना प्रस्ताव दिला असून त्यास उरण नगर परिषदेने मंजुरी दिली आहे. येत्या महिन्याभरात शवदाहिनी सुरू होणार आहे.

या सुविधेमुळे नागरिकांनाही फायदा होणार आहे. उरणमध्ये बोरी येथे स्मशानभूमी असून लाकडाचा वापर करून दहन केले जात असल्याने प्रदूषणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे पर्यावरणाला धोका न पोहचवता दहन करण्यासाठी सुवर्ण महोत्सव नगर उत्थान कार्यक्रमांतर्गत ९५ लाखांच्या निधीमधून हा प्रकल्प राबविला जात आहे.

या नव्या गॅसदाहिनीमुळे धूररहित अंत्यसंस्कार होणार आहेत. त्यामुळे लाकडांची बचत होऊन निसर्गाचेही संरक्षण होणार आहे. उरण नगर परिषद महानगर गॅस कंपनीकडून गॅस विकत घेणार असून ही सुविधा ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्यात येणार आहे.

# मालमत्ता कर भरण्यासंदर्भात जवाहर इंडस्ट्रीज संघटनेसोबत बैठक

## पनवेल महापालिकेस सहकार्य करण्याचे आश्वासन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रातील मालमत्ता कर न भरलेल्या थकबाकीदारांविरोधात महापालिकेने जप्तीच्या कारवाई सुरू केली आहे. त्यानुसार गुरुवारी (दि.२३) मालमत्ता कर अधीक्षक महेश गायकवाड व जप्ती पथकामधील कर्मचाऱ्यांनी जवाहर इंडस्ट्रीज संघटनेचे अध्यक्ष बाळकृष्ण तेरडे, कार्याध्यक्ष स्वप्नील गुप्ते, व्यवस्थापक आर.एस. निकम यांच्यासोबत बैठक झाली.

या बैठकीत जवाहर इंडस्ट्रीज क्षेत्राच्या अधीनस्त सर्व कंपन्यांना मालमत्ता कर भरणा करण्यास प्रवृत्त करून लवकरात लवकर कराचा भरणा करण्याबाबत चर्चा करण्यात आली. महापालिकेस सहकार्य करण्याचे जवाहर इंडस्ट्रीज संघटनेच्या वतीने आश्वासन देण्यात आले.

**जप्तीनंतर करभरणा**

**उपायुक्त गणेश शेटे यांच्या सूचनेनुसार खारघर येथे मालमत्ता कराचा भरणा न केल्याने जप्ती व अटकावणीची कारवाई करण्यात आली. जप्ती व अटकावणीची कार्यवाही करण्यास गेलेल्या मालमत्ताधारक कमल मोहनदास हरजेनी, लिटील वर्ल्ड मॉल यांनी रक्कम १०,००,००० रुपयांचा भरणा केला आहे.**





**पनवेल : आसूडगाव सेक्टर ४ येथे श्री साई मंदिर जिर्णोद्धार आणि प्राणप्रतिष्ठा सोहळा गुरुवारी झाला. या सोहळ्याला आमदार प्रशांत ठाकूर आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत साईबाबांचे दर्शन घेतले. या वेळी भाजप ओबीसी सेल सरचिटणीस दशरथ म्हात्रे, भाजप नेते शशिकांत शेळके, मनोहर म्हात्रे, बबन म्हात्रे, पंढरीशेठ काथारा, संदेश भोपी आदी उपस्थित होते.** (छाया : प्रफुल्ल कांबळे)

# लक्ष्मी पब्लिक स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात

## विविध मान्यवरांची लाभली उपस्थिती







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपला मुलगा हा मार्क मिळवणारे मशीन नाही. मुलांकडून अपेक्षा ठेवाव्यात, मात्र त्या अपेक्षांच्या पूर्ततेसाठी त्यांच्यावर दबाव न आणता त्यांच्यासोबत संवाद साधून त्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला पाहिजे, असा सल्ला आमदार प्रशांत ठाकूर यांनी लक्ष्मी पब्लिक स्कूलच्या वर्षिक स्नेहसंमेलनावेळी दिला.

सुकापूर येथे एल. ए. पाटील एज्युकेशन सोसायटीच्या लक्ष्मी पब्लिक स्कूल इंग्रजी माध्यमाचे वार्षिक स्नेहसंमेलन गुरुवारी (दि.२२) मोठ्या उत्साहात साजरे झाले. या वेळी तरंग या शिर्षकाखाली विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थित मान्यवरांची मने जिंकली. आमदार प्रशांत ठाकूर यांनी मार्गदर्शना करताना सांगितले की, आपल्या परिसरामध्ये असलेल्या उद्योगांसाठी ज्या शिक्षणाची आवश्यकता आहे, ते शिक्षण देण्याची रचना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने घेतली आहे. येणाऱ्या कालावधीत मोठ्या प्रमाणात शहरीकरण होणार आहेत. त्यामुळे सर्व पद्धतीच्या रोजगाराची संधी आपल्या परिसरामध्ये होणार आहे. त्यामुळे आपल्या मुलांचा कल कोणत्या दिशेला आहे ते आपल्याला ओळखता आले पाहिजे, असे सांगत आपल्या आशाअपेक्षांचा अतिरेक पालकांनी करू नये, असा सल्ला दिला.

या स्नेहसंमेलानवेळी भाजपचे पानवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, जि. प. माजी सदस्य अमित जाधव, पं. स. माजी सदस्य भुपेंद्र पाटील, सुकापूरच्या सरपंच योगीता पाटील, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, पनवेल शिक्षण अधिकारी मोहिते, जनार्दन पाटील, बाळकृष्ण पाटील, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, स्कूल कमिटीचे चेअरमन महेश पाटील, उपाध्यक्ष राजेश पाटील, खजिनदार रुपेश पाटील, सचिव प्रशांत गांगुर्डे, भाजप नेते महेंद्र वावेकर यांच्यासह पदाधिकारी, पालक, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# संशोधन स्पर्धेत रामशेठ ठाकूर महाविद्यालय प्रथम



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात रसायनशास्त्र विभागातर्फे स्व. जनार्दन भगतसाहेब यांच्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर नावीन्य संशोधन कल्पना स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत रामशेठ ठाकूर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

या स्पर्धेमध सुमारे ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धेचा निकाल गुरुवारी (दि.२२) जाहीर करण्यात आला, तसेच स्पर्धकांना प्रशस्तीपत्रक व पारितोषिके देण्यात आली. प्रणव चौधरी, मेहुल पाटील, निखिल कांतेला, अपर्णा पाटील रामशेठ ठाकूर कॉलेज यांनी प्रथम क्रमांक पटकाविला, तसेच द्वितीय तनजीला अन्सारी रामशेठ ठाकूर कॉलेज, तृतीय शहीद अली जे. के. सायन्स अँड कॉमर्स कॉलेज घणसोली याने पटकाविला. विजेत्यांना प्रा. डॉ. महेश्वरी झिरपे यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र व पारितोषिक देण्यात आली. प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेच्या आयोजनासाठी प्रा. डॉ. महेश्वरी झिरपे यांनी केले प्रा. डॉ. नीलम लोहकरे, प्रा. डॉ. दीपिका हसीजा, प्रा. रूपाली नागरेकर तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

## संपादकीय

# आंदोलन चिघळणार?

राजधानी नवी दिल्लीनजीक गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेले पंजाब-हरियाणातील शेतकऱ्यांचे आंदोलन आणखी चिघळेल की काय अशी भीती व्यक्त होऊ लागली आहे. वास्तविक शेतकऱ्यांनी मोर्चाला सुरुवात करताच केंद्र सरकारने आपल्या मंत्र्यांना आंदोलकांच्या नेत्यांशी चर्चा करण्यासाठी पाठवले होते. चर्चेच्या अनेक फेऱ्या पार पडूनही अद्याप तोडगा हाती लागलेला नाही. दरम्यान, शेतकरी हा आपला 'अन्नदाता' आहे व त्याच्याशी चर्चेसाठी सरकार नेहमीच तयार आहे या आपल्या भूमिकेवर केंद्र सरकार ठाम आहे.

**नवी दिल्लीनजीक खनौरी आणि शंभू सीमेवर गेले काही दिवस शेतकरी आंदोलन सुरू असून शेतमालाला किमान आधारभूत किंमत (एमएसपी) मिळावी ही या शेतकऱ्यांची प्रमुख मागणी आहे. पीककर्ज माफी व पेन्शन आदी इतर मागण्याही हे शेतकरी करीत असून आंदोलनात प्रामुख्याने पंजाब व हरियाणाच्या शेतकऱ्यांचाच समावेश आहे. यापूर्वी २०२०मध्येदेखील पंजाब-हरियाणाच्याच शेतकऱ्यांनी तीन कृषीविषयक कायद्यांच्या विरोधात आंदोलन केले होते. तेव्हाही केंद्र सरकारने प्रतिष्ठेचा प्रश्न न करता संबंधित तिन्ही कृषीविषयक कायदे रद्द केले होते. आताही सरकारने शेतकऱ्यांचे आंदोलन हाताळताना कमालीचा संयम दाखवला आहे तसेच शेतकऱ्यांच्या नेत्यांशी चर्चा करण्यासाठी पुढाकारही घेतला आहे, परंतु चर्चेतून अद्याप तरी कुठलाही समाधानकारक तोडगा निघू शकलेला नाही. दरम्यान, राममंदिर बांधल्यामुळे मोदींचा आलेख खूप उंचावला आहे. आपल्याला हा आलेख खाली आणावा लागेल अशा आशयाचे विधान आंदोलक शेतकऱ्यांचे नेते जगजीत सिंह डल्लेवाल यांनी केल्याचे दर्शवणारा एक व्हिडीओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाला होता. त्यामुळे या आंदोलनाच्या हेतूविषयी शंका उपस्थित केल्या जाऊ लागल्या, मात्र देशभरातील शेतकऱ्यांच्या हिताशी संबंधित प्रत्येक संकल्प पूर्ण करण्यासाठी आपले सरकार कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यापूर्वीही अनेकदा केला आहे व पुढेही मोदी सरकारचे धोरण शेतकऱ्यांचे कल्याण साधणारेच असेल हे नक्की. त्यानुसार केंद्र सरकारने बुधवारी ऊसाचा एफआरपी आठ टक्क्यांनी वाढवला. शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू असतानाच मोदी सरकारने हा मोठा निर्णय घेतला. या निर्णयाचा देशभरातील लाखो ऊसउत्पादक शेतकऱ्यांना फायदा होईल. १ ऑक्टोबर २०२४पासून हा एफआरपी लागू होईल. २०२४-२५साठी ३४० रुपये प्रति क्विंटल किंमत निश्चित करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. गेल्या वर्षी ही किंमत ३१५ रुपये इतकी होती. एकीकडे सरकार नेहमीप्रमाणे शेतकऱ्यांना लाभदायक अशी धोरणे अनुसरत असताना शेतकरी आंदोलनातील घडामोडींचा राजकारणासाठी वापर करण्याचे विरोधकांचे प्रयत्न सुरूच आहेत. बुधवारी पोलिसांशी झालेल्या चकमकीत एका २१ वर्षीय आंदोलक शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आला. वास्तविक खनौरी येथून तीन जणांना रुग्णालयात आणण्यात आले होते. त्यापैकी डोक्यावर जखमेच्या खुणा असलेल्या एकाचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले असले तरी हा मृत्यू पोलिसांच्या कारवाईत झाल्याचे प्रारंभी स्पष्ट होऊ शकले नाही. दरम्यान शेतकऱ्यांनी पोलिसांवर काठ्या आणि दगडांनी केलेल्या हल्ल्यात १२ पोलीस जखमी झाले आहेत. शेतकऱ्याच्या मृत्यूनंतर आंदोलकांनी आंदोलन तात्पुरते स्थगित केले असले तरी हजारो शेतकरी खनौरी आणि शंभू सीमेवर तळ ठोकून आहेत. कायदा व सुव्यवस्था राखणे हीदेखील सरकारचीच जबाबदारी असल्याने पोलिसांकरवी सरकारला परिस्थिती हाताळावी लागते आहे. आंदोलक शेतकऱ्यांची समजूत घालण्यात सरकारला लवकर यश येईल अशी अपेक्षा करूया.**

# महाराष्ट्राला संरक्षण उत्पादनाचे प्रमुख केंद्र बनवणारा 'डिफेन्स एक्स्पो'



एक वेळ अशी होती की, अमेरिकेच्या दबावापुढे झुकलेल्या रशियाने भारताला क्रायोजेनिक इंजिन प्रणाली देण्यास नकार दिला. प्रक्षेपण यानामध्ये असणारे हे इंजिन म्हणजे अतिवजनाच्या उपग्रहांना अंतरिक्षात पोहचवणारी अश्वशक्ती क्षमता आहे. आपल्या पीएसएलव्ही म्हणजेच भूउपग्रह प्रक्षेपण यानाचे यश याच इंजिनावर अवलंबून आहे. रशियाच्या नकारानंतर आपल्या वैज्ञानिकांनी दूरदृष्टी दाखवत स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करून काही वर्षातच क्रायोजेनिक इंजिन तयार केले. तेव्हापासून भारतीय वैज्ञानिकांनी इतर देशांसमोर हात पसरण्यापेक्षा वेळोवेळी आव्हाने स्वीकारत देशी बनावटीचे तंत्रज्ञान विकसित करत अंतराळ संशोधनात आज पहिल्या पाच देशांमध्ये आपले स्थान पक्के केले आहे.

हीच स्थिती संरक्षण शस्त्रास्त्रे व साहित्य खरेदीबाबतही होती. अमेरिका शस्त्रास्त्रे निर्मिती करण्यात आणि विकण्यातही अग्रेसर आहे. याचप्रमाणे, रशिया, फ्रांस, इस्त्राईल, उत्तर व दक्षिण कोरिया हे देशही यात आघाडीवर आहेत. पण आज भारत अनेक शस्त्रास्त्रे स्वदेशी बनावटीची वापरतो. स्वदेशी तंत्रज्ञान ही संकल्पना संरक्षण क्षेत्रात आणल्यानंतर मोठ्या प्रमाणात संरक्षण उत्पादने तयार करणाऱ्या एमएसएमई देशात तयार झाल्या आहेत. आज देशात मोठ्या प्रमाणात संरक्षण साहित्य निर्माण होत आहे. यात महाराष्ट्र आघाडीवर असून राज्यात १० ऑर्डिनन्स फॅक्टरी आणि ५ डिफेन्स पी एस यू आहेत. टाटा, भारत फोर्ज, सोलार, एल अ‍ॅण्ड टी, महिंद्रा, निबे अशा मोठ्या कंपन्या राज्यात संरक्षण क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपादने तयार करीत आहेत.

भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्रात आत्मनिर्भर भारताच्या वाटचालीला आणखी बळकटी देण्यासाठी राज्य शासनाच्या उद्योग विभागामार्फत महाराष्ट्रातील संरक्षण साहित्य उत्पादन करणाऱ्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राला चालना देण्याच्या उद्देशाने २४ ते २६ फेब्रुवारी २०२४ दरम्यान महाराष्ट्र एमएसएमई डिफेन्स एक्स्पोचे आयोजन करण्यात आले आहे. पुण्यातील मोशी येथे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि कन्व्हेन्शन सेंटर येथे हा एक्स्पो होत आहे. विशेष म्हणजे संरक्षण उत्पादन क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देण्यासाठी राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना सक्षम करणारा महाराष्ट्रातील या प्रकारातील हा पहिलाच डिफेन्स एक्स्पो आहे. संरक्षण उत्पादन क्षेत्रातील अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्राविण्य असणाऱ्या उद्योगातील समन्वयाला चालना देण्याच्या उद्देशाने वायुसेना, नौसेना आणि स्थलसेना या तीनही सुरक्षा दलांचा यात महत्वाचा सहभाग असणार आहे. या एक्स्पोमध्ये १ हजारहून अधिक सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग, स्टार्ट-अप आणि २०,००० हून अधिक अभियांत्रिकी विद्यार्थी एकत्र येऊन ज्ञान आणि तंत्रज्ञानाची देवाणघेवाण करतील. यात एल अ‍ॅण्ड टी, महिंद्रा, टाटा, डीआरडीओ आणि संरक्षण क्षेत्रातील सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या-पीएसयु यासह विविध प्रतिष्ठित उद्योगातील तज्ज्ञ असतील. हा एक्स्पो महाराष्ट्राला संरक्षण उत्पादनाचे प्रमुख केंद्र म्हणून निश्चितच पुढे नेणारा ठरणार आहे.

**भारताच्या संरक्षण क्षेत्रात महाराष्ट्राची भूमिका**

भारताच्या संरक्षण क्षेत्रात महाराष्ट्राची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे देशाच्या ४० पैकी १० संरक्षण उत्पादन आणि आयुध निर्माण करणारे कारखाने महाराष्ट्रात आहेत. राज्याची राजधानी-मुंबई, ही भारतीय नौदलाच्या पश्चिम कमांडचे मुख्यालय आहे. भारतीय नौदलाचे जनक छत्रपती शिवाजी महाराज यांची भूमी असलेले पुणे, भारतीय लष्कराच्या दक्षिणी कमांडचे मुख्यालय आहे. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचेही मुख्यालय आणि सरंक्षण संशोधन आणि विकास संस्थासुद्धा याच जिल्ह्यात महत्त्वाची भूमिका बजावते. पुण्याचे महत्त्व अधोरेखित करणारे सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालय आणि मुनिशन इंडिया लिमिटेडचे मुख्यालय सुद्धा पुण्यात आहे. भारतीय लष्कराचे आर्मर्ड कॉर्प्स स्कूल आणि सेंटर हे महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यात पुण्यापासून सुमारे १२० किलोमीटर अंतरावर आहे. लष्कराशी संबंधित एवढ्या मोठ्या यंत्रणा एकाच राज्यात असणारे महाराष्ट्र हे एकमेव राज्य आह

**एक्स्पोची मुख्य उद्दिष्टे**

सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग डिफेन्स एक्स्पो हे एक अभूतपूर्व प्रदर्शन असणार आहे. या क्षेत्रातील नवकल्पना आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासोबतच संरक्षण क्षेत्रातील प्रमुख खरेदीदार म्हणजे तीनही सैन्य दल आणि विक्रेता यांच्यातील संपर्क वाढवणे, महाराष्ट्रातील डिफेन्स एमएसएमईची तयार झालेली इकोसिस्टम अधिक बळकट करण्यासोबतच संरक्षण क्षेत्रातील खरेदीदारांसाठी अर्थपूर्ण संवाद निर्माण करणे, यासोबतच व्यवसायाच्या परस्पर फायदेशीर संधी ओळखण्यासाठी डायनॅमिक फोरमची स्थापना करणे, संरक्षण उत्पादन क्षेत्रात नावीन्यपूर्ण उद्योजकतेची संस्कृती जोपासणे, अत्याधुनिक उपायांच्या विकासास प्रेरणा व प्रोत्साहन देणे, धोरणात्मक उपक्रम राबवून शाश्वत आणि मजबूत वाढीसाठी आवश्यक सहाय्य प्रदान करून महाराष्ट्रातील एमएसएमई क्षेत्राच्या विस्तारासाठी सक्रियपणे योगदान देणे, महत्त्वाच्या क्षेत्रातील एमएसएमईसाठी अनुकूल संधी निर्माण करून खरेदीदार आणि विक्रेते यांच्यातील संपर्क मजबूत करणे हे या एक्स्पोमागील महत्त्वाचे उद्देश आहेत.

महाराष्ट्रात डायनॅमिक एमएसएमई जाळ्यासाठी एक मजबूत आणि टिकाऊ पुरवठा साखळी फाउंडेशनची स्थापना करणे, संरक्षण उत्पादन आणि निर्यातीसाठी मार्ग मोकळा करणे, शैक्षणिक-उद्योग सहकार्याच्या प्रगतीद्वारे राज्य आणि राष्ट्रासाठी एक शक्तिशाली परिसंस्था उत्प्रेरित करणे हासुद्धा या प्रदर्शनाचा उद्देश आहे.

**महाराष्ट्राचे सक्षमीकरण : एमएसएमई, संरक्षण आणि तंत्रज्ञान**

महाराष्ट्रातील स्टार्ट-अप कंपन्यांद्वारे तयार केले जाणारे काही भविष्यकालीन स्वदेशी तंत्रज्ञान हे संरक्षण तंत्रज्ञान क्रांतीचे पुढचे पाऊल ठरणार आहे. त्यामुळे राज्य या क्षेत्रात निश्चितच आघाडी घेईल यात शंका नाही. यातील महत्वाच्या बाबी अशा आहेत.

हवाई देखरेखीसाठी ड्रोन : पुरवठा आणि ड्रॉप डाऊनची क्षमता असलेले हे पहिले आणि एकमेव मानव-पोर्टेबल स्वायत्त ड्रोन आहे.

व्हिजन प्रोसेसिंग सिस्टीम उत्पादन- रणांगणाचे रिअल-टाइम चित्रण दाखवते. प्रगत इमेजिंग आणि सेन्सर तंत्रज्ञान एकत्र करते; यात दिवस आणि रात्रीचे चित्रण दाखवण्याची क्षमता आहे.

जैव-पॉलिमर प्लॅटफॉर्म : जखमेच्या काळजीसाठी आधारित उत्पादने- हे बायोएक्टिव्ह मायक्रोफायबर जेलिंग तंत्रज्ञानावर आधारित हेमोस्टॅटिक मलमपट्टी करते.

रोबोटिक सोल्यूशन्स : एकत्रित कार्यरत प्रणाली (युनिफाइड ऑपरेटिंग सिस्टीम) अनेक क्षेत्रांमध्ये जोडलेले रोबोट्स व्यवस्थापित करण्यात मदत करते.

दृष्य पाळत प्रणाली : हे संरक्षण आणि एरोस्पेस संस्थांसाठी उच्चस्तरीय इलेक्ट्रो-ऑप्टिक पाळत ठेवणारी प्रणाली आहे.

लढाऊ शस्त्र प्रणाली : या टाक्या इंजिनसह मागील चाकांना शक्ती पुरवणारा मोटारीच्या यंत्राचा भाग, लढाऊ चिलखत, युद्ध भूमीवर अ‍ॅन्टीड्रोन संरक्षण प्रणालीसह एकत्रीकरणासाठी तयार केल्या आहेत.

अशा नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानासह महाराष्ट्र या एक्स्पोमध्ये आपली क्षमता सिद्ध करेल. त्याचबरोबर या प्रदर्शनात अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांशी प्रत्येक सत्रात होणारा संवाद विद्यार्थ्यांच्या भविष्यातील कारकिर्दीला वेगळा आयाम आणि प्रेरणा देणारा ठरेल. कोण जाणे यातूनच भविष्यात काही नाविन्यपूर्ण स्टार्टअप्स सुरु होतील.

**-मनीषा सावळे,**
विभागीय संपर्क अधिकारी
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मंत्रालय, मुंबई




## तुमचा फोन हॅक झालाय? मग 'असे' तपासून पहा...



स्मार्टफोन असो वा लॅपटॉप हॅकिंगची समस्या जिकडेतिकडे आढळते. सेलिब्रेटी असो वा सर्वसामान्य सर्वांना याचा फटका बसला आहे. मोठे आर्थिक नुकसान आणि मनस्ताप सहन करावा लागला आहे. असा हल्ला कधीही कुणाच्याही डिव्हाईसवर होऊ शकतो आणि क्षणात मोठे नुकसान होऊ शकते. हॅकिंगच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने सर्वांनी सावध राहण्याची गरज आहे. खबरदारी म्हणून काही बाबींचे पालन करणे गरजेचे आहे. फोनचे हॅकिंग झाले आहे की नाही, याची पडताळणी केली पाहिजे. याची खातरजमा पुढील मार्गांनी करता येते...

बॅटरी लाइफ कमी होणे- नेहमी बराच काळ चालणारी बॅटरी अचानक लवकर डिस्चार्ज होऊ लागते. फोन हॅक झाल्यास अनेक हेरगिरी करणाऱ्या प्स छुप्या पद्धतीने सुरु असतात. त्यासाठी बॅटरीचा वापर होत असतो. अशावेळी फोन तातडीने तज्ज्ञाला दाखवावा.

नको असलेले ॲप्स - अनेकदा तुम्हाला नको असलेल्या प्स फोनमध्ये डाऊनलोड होत असतात. तुमच्या परवानगीशिवाय त्या इन्स्टॉल झालेल्या असतात. यातून हॅकिंगचा प्रयत्न वा हेरगिरी होऊ शकते. अशा ॲप्सवर सतत नजर ठेवली पाहिजे.

डेटा वापर खूप वाढणे - तुमचा फोन ट्रॅक होत असल्याने अधिकचा डेटाचा वापर केला जात असतो. अशावेळी सतर्क झाले पाहिजे. डिव्हाइस खराब होणे

डिव्हाइस खराब होणे - फोन हॅक झाल्यास अचानक स्क्रीन फ्लॅशिंग होणे, फोन सेटिंग आपोआप बदलणे, फोन अचानक बंद पडणे असे प्रकार होऊ लागतात.

फोन गरम होणे - हेरगिरी ॲप तुमच्या डिव्हाइसचे लोकेशन ट्रॅक करीत असतात. त्यात जीपीएसचाही वापर होत असतो. यामुळे हार्डवेअरवर कमालीचा दबाव येत असतो व फोन प्रमाणाबाहेर तापत असतो.

ब्राउजिंग हिस्ट्री तपासणे - फोनची ब्राउजिंग हिस्ट्री नेहमी तपासावी. यामुळे ट्रॅकिंग करणारी किंवा हेरगिरी करणारी एखादी प्लिकेशन डाऊनलोड झाली आहे की काय, याची माहिती मिळू शकते. त्या वेबसाईटची माहितीही मिळते.

कॉलिंगवेळी सतत येणारे आवाज - काही हेरगिरी प कॉल रेकॉर्ड करीत असतात. कॉल केला असता बॅकग्राऊंडमध्ये सातत्याने आवाज येत असल्यास समजून घ्यावे की फोन हॅक झालेला आहे.

# अभिनेत्री, निर्मात्या ललिता पवार



भारतीय चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेत्री ललिता पवार यांचा जन्म नाशिकजवळील येवला येथे झाला. त्यानंतर त्यांचे पुढील वास्तव्य इंदूर आणि पुणे येथे होते. त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव अंबिका लक्ष्मण सगुण. त्यांचे वडील व्यापारी होते. ललिताबाईंचे शिक्षण प्राथमिक शाळेपर्यंत झाले. त्यानंतर त्यांनी मूकपटात बालकलाकार म्हणून काम करण्यास सुरुवात केली.

१९२८ साली आर्यमहिला या मूकपटात त्यांना भूमिका मिळाली. त्यानंतर गनिमी कावा (१९२८), जी. पी. पवारदिग्दर्शित ठकसेन राजपुत्र (१९२९), समशेर बहादूर (१९३०), चतुर सुंदरी (१९३०), पृथ्वीराज संयोगिता (१९३०), दिलेर जिगर (१९३१) इ. मूकपटांत त्यांनी विविध प्रकारच्या भूमिका केल्या. पुढे बोलपटांची सुरुवात झाल्यानंतर त्यांना बोलपटातही चांगली कामे मिळू लागली. मुंबईच्या चंद्र आर्ट्सच्या हिम्मते मर्दा (१९३५) या बोलपटात त्या नायिका होत्या. या चित्रपटाचे नायक मास्टर भगवान होते. हाच त्यांचा मुख्य भूमिका असलेला पहिला बोलपट. हा चित्रपट खूप गाजला. या चित्रपटाचे दिग्दर्शक गणपतराव पवार होते.

१९३८मध्ये टॉलस्टॉयच्या रेसरेक्शन या कादंबरीवरून दुनिया क्या है? (१९३८) या चित्रपटाची निर्मिती ललिताबाईंनी केली आणि त्यात भूमिकाही केली. त्यातील गाणी

**निमित्त**

त्यांनी स्वत:च म्हटली होती. या चित्रपटाचे दिग्दर्शन त्यांचे पती गणपतराव पवार यांनीच केले होते. भालजी पेंढारकरलिखित-दिग्दर्शित अरुण पिक्चर्सच्या नेताजी पालकर (१९३९) या चित्रपटात काशी या नायिकेची भूमिका त्यांनी प्रभावीपणे वठविली. हा त्यांचा पहिला मराठी बोलपट. एका चित्रपटाच्या चित्रिकरणादरम्यान अनवधनाने घडलेल्या अपघातामुळे त्यांना चेहऱ्याच्या पक्षाघाताचा आजार झाला व या आजारपणात त्यांचा एक डोळा अधू झाला. परिणामी त्यांना चित्रपटांमध्ये नायिकेच्या भूमिका मिळणे बहुतांशी बंद झाले. पुढे त्यांनी चित्रपटांमध्ये चरित्र भूमिका साकारण्यास सुरुवात केली. त्यांच्या महत्त्वाच्या भूमिका असलेले मराठी चित्रपट म्हणजे अमृत (१९४२), गोरा कुंभार, जय मल्हार (१९४७), रामशास्त्री (१९४४), अमर भूपाळी (१९५१), मानाचं पान (१९५०), चोरीचा मामला (१९७६) हे होत. प्रभातच्या रामशास्त्री या चित्रपटात त्यांनी महत्त्वाकांक्षी, निष्ठूर आणि करारी स्वभावाच्या आनंदीबाईंची भूमिका केली होती.

ललिताबाईंनी संस्मरणीय भूमिका केलेल्या गाजलेल्या हिंदी चित्रपटांमध्ये दहेज (१९५०), परछाई (१९५२), दाग, सुजाता (१९५९), श्री ४२०, अनाडी, जंगली, प्रोफेसर, घराना, खानदान, घर बसा के देखो, परवरिश, सास भी कभी बहू थी, बहूरानी व आनंद यांचा समावेश आहे. अभिनयाच्या विविध छटा असलेल्या अशा अनेक व्यक्तिरेखा त्यांनी सक्षमपणे साकारल्या.

ललिताबाईंना अनाडी चित्रपटातील डिसा या भूमिकेकरिता फिल्मफेअरचा साहाय्यक अभिनेत्रीचा पुरस्कार मिळाला (१९६०). त्यांना १९६१ साली संगीत नाटक अकादेमी पुरस्कार व १९७७ साली महाराष्ट्र राज्य पुरस्कार प्राप्त झाला. गृहस्थी, सजनी, अनाडी, घर बसा के देखो या चित्रपटांतील उत्कृष्ट भूमिकांबद्दल त्यांना विविध पुरस्कार मिळाले. पुणे येथे एकाकी अवस्थेत त्यांचे निधन झाले. **(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : येथील खोरा बंदरात नूतन जेट्टीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# आयुष्यमान भारत योजनेत 'या' मोठ्या शस्त्रक्रिया होणार



कोणत्याही आजारावर उपचारासाठी तुम्ही रुग्णालयात पोहचता, त्यावेळी उपचारासाठी मोठा खर्च येतो. भल्याभल्यांची बचत साफ होते. सर्वसाधारण आजारावर उपचारासाठी मोठा खर्च येतो. गरीबांना तर खासगी रुग्णालयातील उपचार आवाक्यातच नसतो. शासकीय रुग्णालयात त्यांना उपलब्ध उपचार करावा लागतो. त्यासाठीच केंद्र सरकारने आयुष्यमान भारत योजना आणली आहे. त्यामध्ये देशातील कोट्यवधी गोरगरिबांना पाच लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत करता येतात. या योजनेत मोठंमोठ्या शस्त्रक्रिया करता येतात.

आयुष्मान भारत योजनेमध्ये १७६० प्रकारच्या आजारांवर इलाज करण्यात येतो. आता यामध्ये १९६ आजार आणि शस्त्रक्रियांचा समावेश करण्यात आला आहे. खासगी रुग्णालयात या आजारावर या योजनेतंर्गत उपचार होत नाही. यामध्ये मोतीबिंदू, सर्जिकल डिलिव्हरी, मलेरिया यासह इतर अनेक आजारांचा समावेश आहे.

आयुष्यमान भारत योजने अंतर्गत कोण-कोणत्या सर्जरी तुम्ही करु शकता, हे तुम्हाला माहिती आहे का? आयुष्यमान भारत योजनेतंर्गत प्रोस्टेट कॅंसर, डबल वॉल्व रिप्लेसमेंट, कोरोनरी आर्टरी बायपास, पल्मनरी वॉल्व रिप्लेसमेंट, स्कल बेस सर्जरी, टिश्यू एक्सपेंडर, पीडियाट्रिक सर्जरी, रेडिएशन ओंकोलॉजी, न्यूरोसर्जरी, अँजियोप्लास्टी विद स्टेंट या सारख्या शस्त्रक्रिया करता येतात. या योजनेतंर्गत ही सर्जरी तुम्ही खासगी रुग्णालयात पण करु शकता.

आयुष्यमान भारत योजना लागू झाल्यापासून या योजनेत ८० टक्क्यांहून अधिक रुग्णांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. अनेक रुग्णालये या योजनेतंर्गत उपचार करतात. पण अजूनही अनेक मोठी रुग्णालये आणि इतर इस्पितळात उपचार होत नाही. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना फटका बसतो. त्यांना अधिक खर्च करावा लागतो. खासकरुन आपत्कालीन परिस्थितीत, पैसे नसल्यास मोठी अडचण येते. अनेकदा मोठ मोठी रुग्णालये उपचार घेण्यास नकार देतात, कारण ही रुग्णालये या योजनेत बसत नाहीत, परंतु प्रत्येक वर्षी कोट्यवधी लोक या योजनेतंर्गत उपचार घेतात.

मोदी सरकार जनतेच्या आरोग्याची काळजी विविध योजनेंतर्गत घेत आहे. त्याचा नागरिकांनी लाभ घावा.

# महिलांच्या आरोग्यासाठी राबविलेले महाआरोग्य शिबिर लाभदायक -ना. तटकरे

**पाली : प्रतिनिधी**

रिलायन्स नागोठणे कंपनीने महिलांच्या निरोगी आणि सदृढ आरोग्यासाठी राबविलेले महाआरोग्य शिबिर अत्यंत लाभदायक असल्याचे गौरवोद्गार महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी काढले.



रिलायन्स नागोठणे कंपनी व्यवस्थापणातर्फे गुरुवारी (दि. २२) बालगंधर्व रंगभवन, पेट्रोकेमिकल टाऊनशिप येथे कंपनी कार्यक्षेत्रातील महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर व हळदीकुंकू कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी ना. तटकरे यांनी, आरोग्य शिबिर हे आजच्या धावपळीच्या युगात अतिशय महत्त्वाचे असून वेळोवेळी महिलांनी आपली आरोग्य तपासणी करावी, असे आवाहन केले. स्त्री रोगतज्ज्ञांचेही महिलांच्या आरोग्य आणि आजाराबाबत मार्गदर्शन लाभले.

आरोग्य शिबिरामध्ये रक्तदाब, मधुमेह, रक्ताक्षय (ॲनिमिया) तपासणी विनामूल्य करण्यात आली, तसेच स्त्रियांना भेडसावणाऱ्या मेनोपॉज या समस्येवर तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. आरोग्याशी सबंधित नागरिकांना लागणारे औषधही या वेळी विनामूल्य देण्यात आले. या वेळी रमेश धनावडे यांनी रिलायन्स नागोठणे कंपनी कार्यक्षेत्रातील गावे, आदिवासी वाड्या पाड्या, शाळा, ग्रामपंचायत इमारत नूतनीकरण, पायाभूत नागरी सेवा सुविधा, तसेच परिसराच्या वकासासाठी सामाजिक बांधिलकी उपक्रम अंतर्गत (सीएसआर फंड) अंतर्गत राबविलेल्या उपक्रमांची, विविध कामांची सविस्तर माहिती दिली, तसेच भविष्यातदेखील विविध लोकोपयोगी, विधायक आणि गरजा ओळखून मागणीच्या अनुषंगाने सामाजिक पायाभूत नागरी सेवासुविधा राबविण्यात येणार असल्याची ग्वाही रमेश धनावडे यांनी दिली.

शिबिराला लेडीज क्लब अध्यक्ष सीमा गोयल, शुभदा केचे, स्त्री रोग तज्ज्ञ मेघा घाटे, नागोठणे पोलीस निरीक्षक हरेश कळसेकर, वरदा कुलकर्णी, उदय जवके, संतोष कोळी, प्रीती कुथे, ग्रामसेवक देवता भंडारी, विभागातील सर्व सरपंच, उपसरपंच, तसेच महिला बचत गट, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# रोहा तहसीलदार कार्यालयात धाटावच्या मच्छिमारांची बैठक

## नुकसानभरपाई देण्याची मागणी

**रोहे : प्रतिनिधी**

धाटाव औद्योगिक क्षेत्रातील दूषित पाण्यामुळे कुंडलिका नदीकिनारी असलेल्या गावातील मच्छिमारांवर उपासमारीची वेळ आली आहे. दूषित पाण्यामुळे आमचा व्यवसाय बुडाला असून आम्हाला नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी मच्छीमारांनी केली आहे.

यासंबंधी निवेदन तहसीलदार किशोर देशमुख यांच्यासह संबंधित खात्यांना कोळी महासंघाचे दक्षिण रायगड जिल्हा संपर्कप्रमुख सुर्यकांत वाघमारे यांनी दिले होते. या अनुषंगाने तहसीलदार किशोर देशमुख, नायब तहसीलदार राजेश थोरे, एमआयडीसी अभियंता गीते, होडी परवाना अधिकारी वालन व मच्छीमारांसमवेत बैठक आयोजित करण्यात आली होती.



धाटाव औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यातील सांडपाण्यामुळे कुंडलिकानदी प्रदूषित होत आहे. या प्रदूषणामुळे कुंडलिक नदीपात्रातील मासे मरत आहेतच, परंतु बीजनिर्मितीवर परिणाम होत आहे. परिणामी मच्छिमारांना कुंडलिक नदीपात्रात मासे मिळत नसल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे नुकसानभरपाई मिळण्याची मागणी करण्यात आली आहे.

या बैठकीत तहसीलदार किशोर देशमुख यांनी प्रदूषण मंडळ, मत्सविभाग, एमआयडीसी, महसूल व मच्छिमारांची संयुक्त बैठक येत्या सोमवारी लावण्यात येईल असे सांगितले. याचबरोबर संबंधीत खात्यांकडून संयुक्त स्थळ पहाणी करण्यात येईल, असे सांगितले. या वेळी पडम, खारापटी, निडी, झोळांबे, लक्ष्मीनगर, खारगाव, व्हावे, नवखार, गोफण, कुंबोशीसह कुंडलिक तिरावरील गावातील मच्छिमार उपस्थित होते.

# रेवदंड्यातील श्री पांचाळेश्वर मंदिराचा उत्सव



**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंड्यातील पुरातन श्री पांचाळेश्वर मंदिराचा वार्षिक उत्सव सोहळ्याचे आयोजन दैवज्ञ ब्राम्हण समाजाचे वतीने करण्यात आले होते. यानिमित्ताने विविध धार्मिक विधी तसेच महाप्रसादाचे आयोजन दैवज्ञ ब्राम्हण समाजाचे वतीने करण्यात आले होते.

आमदार महेंद्र दळवी यांनी उत्सवाला भेट देत दर्शन घेतले. या वेळी रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे, कामगार नेते दिपक रानवडे, शिवसेना अलिबाग तालुकाप्रमुख अनंत गोधंळी, शिवसेना नेते संकेत राऊत, उपसरपंच मंदाताई बळी, ग्रामपंचायत सदस्य सुराराम माळी आदी उपस्थित होते.

प्रारंभी आमदार महेंद्र दळवी यांनी श्री पांचाळेश्वराचे मोठया भाविकतेने दर्शन घेऊन नतमस्तक झाले.

# महाडमध्ये शॉर्टसर्किटच्या आगीत वाडा जळून खाक

## दोन बैलांचा मृत्यू

**महाड : प्रतिनिधी**

विद्युत वाहिनीमध्ये तांत्रिक बिघाड होऊन लागलेल्या आगीमध्ये शेतकऱ्याच्या वाड्यासह दोन बैल मृत्यूमुखी पडल्याची दुर्दैवी घटना महाड तालुक्यातील रावढळ येथे घडली.



तालुक्यातील चंद्रकांत मांडवकर हे रावढळ यांच्या शेतात गुरुवारी (दि. २२) दुपारच्या सुमारास विद्युत खांबावरील चालू विद्युतवाहिनी तुटून त्यातून बाहेर पडलेल्या ठिणग्या गवत आणि वाड्यावर उडाल्याने आग लागली. या घटनेत वाडा पूर्णपणे जळून खाक झाला. या वाड्यामधील दोन बैल आगीच्या भक्षस्थानी पडले. यामध्ये हे दोन्ही बैल होरपळून त्यातच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

महाड महसूल विभागाचे कर्मचारी घटनास्थळी रवाना झाली आणि झालेल्या नुकसानीचा पंचनामा केला आहे.


**COMMERCIAL PREMISES**
**FOR SALE / RENT at PANVEL**
1st Floor, Neelaknth Darshan CHS. Ltd.,
opp. Orion Mall, Panvel
1) Office No. 18 (876 sq.ft. Carpet)
2) Office No. 19 (427 sq.ft. Carpet)
Contact Owner
**88798 18185 / 89761 33833**
Email: hradmin.whpsons@gmail.com


# रेल्वेतून पडून महिलेचा मृत्यू

**माणगाव** : चालत्या कोकण रेल्वेतून पडून ४० वर्षीय महिलेला गंभीर दुखापत होऊन तिचा मृत्यू झाला. ही घटना गुरुवारी (दि. २२) माणगाव टेशनदरम्यान घडली. याबाबतची माहिती प्रतिक मेश्राम (रा.वरसगाव-कोलाड, रोहा) यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली.

मिळालेल्या माहितीनुसार, सुराणी देवनीश डुंगडुंग (वय ४०, रा.पहाणटोळी, झारखंड) व त्यांचे पती देवनीश हाबील डुंगडुंग असे मांडवी एक्स्प्रेसमधून प्रवास करीत असताना ही महिला माणगाव रेल्वेस्टेशन दरम्यान रेल्वेतून खाली पडल्या. या महिलेला उपजिल्हा रुग्णालय येथे उपचाराकरिता आणले असता येथील डॉक्टरांनी मृत घोषित केले.

# तुर्भे खुर्द येथे जमिनीच्या वादातून मारहाण

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील तुर्भे खुर्द येथील दोन सख्ख्या भावांमधील पक्के वैर गुरूवारी (दि.२२) सायंकाळी उघड झाले असून जमिनीच्या जुन्या वादातून एका भावाने दुसऱ्या भावाला लोखंडी शिगेने मारहाण केल्याचा गुन्हा पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये दाखल झाला आहे.

तुर्भे खुर्द येथील मनोहर शंकर उतेकर (वय ६५) याने घराच्या बाजूला पडवीमध्ये वीटा ठेवल्याचे पाहून त्याचाच सख्खा भाऊ असलेल्या सहदेव शंकर उतेकर याला मागील जुन्या जमिनीच्या वादाची आठवण होऊन त्याने सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घरातून लोखंडी शिग आणून मनोहर यांना शिवीगाळ करीत त्याच्या उजव्या हाताच्या कोपऱ्यावर तसेच कानाच्या डाव्या बाजूला डोक्यावर शिगेने मारहाण करून जबर जखमी केले.

या प्रकारनंतर पोलादपूर पोलीस ठाण्यामध्ये आरोपी सहदेव शंकर उतेकर यांच्याविरूद्ध रात्री गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस हवालदार बामणे यांनी गुन्हा दाखल करून घेतला असून पोलीस हवालदार जागडे हे तपासिक अंमलदार म्हणून पोलीस निरिक्षक अनिल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत आहेत.


**पनवेल महानगरपालिका, पनवेल**

**ई-निविदा नोटीस**

मा.आयुक्त, पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी व्यक्ती, संस्था, ठेकेदार, किंवा कंपनी यांचेकडून ई-निविदा पद्धतीने निविदा मागवीत आहेत. कोरा निविदाफॉर्म https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. २४/०२/२०२४ ते दि. ०१/०३/२०२४ पर्यंत दुपारी ०३.०० पर्यंत उपलब्ध राहणार आहेत. सदरच्या जाहीर ई निविदा दि. २४/०२/२०२४ ते दि.०१/०३/२०२४ पर्यंत दुपारी ०३.०० वाजेपर्यंत ऑनलाईन कार्यप्रणालीव्दारे स्विकारण्यात येतील.

| अ. क्र. | कामाबाबत तपशील | कामाची मुदत | बयाणा रक्कम | कोरी ई-निविदा फॉर्मची किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती 'अ' हद्दीत आपत्कालिन परिस्थितीत व पावसाळ्यापूर्वी नाले साफसफाईकरणे. | ०२ वर्ष | रु.३,५५,०००/- | रु. २०००/- + ५% GST |

दिनांक : २३/०२/२०२४
जा.क्र.पमपा/घकवि/२५२३/प.क्र. ३६३/१७१/२०२४

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका, पनवेल**


# अल्पवयीन मुलीच्या विनयभंगप्रकरणी आरोपीस पाच वर्षे सक्तमजुरीची शिक्षा

## माणगाव सत्र न्यायालयाचा निकाल

**श्रीवर्धन : बातमीदार**

अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याप्रकरणी एका आरोपीला माणगाव सत्रालयाने पाच वर्षे सक्त मजुरीची शिक्षा सुनावली आहे, तसेच १५०० रुपये दंडदेखील केला आहे.

या प्रकरणातील फिर्यादी पीडित बालिका ही आरोपीची अल्पवयीन मुलगी आहे. आरोपीने तिच्या अज्ञानाचा फायदा घेऊन रात्रीचे वेळी बळजबरी करून, मनात लज्जा उत्पन्न होईल, असे कृत्य करून तीस मारहाण केली. याबाबत दिघी सागरी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक के. एस. गावडे यांनी केला व आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. खटल्याची सुनावणी विशेष न्यायालय माणगाव रायगड येथे झाली.

या गुन्ह्यात पीडित मुलीची साक्ष महत्त्वाचा पुरावा ठरली. अतिरिक्त शासकीय अभियोक्ता योगेश अवधूत तेंडुलकर यांनी सरकार पक्षाच्या वतीने काम पाहिले. सुनावणीदरम्यान पैरवी अधिकारी अनंत पवार, शशिकांत कासार, छाया कोपनर व पोलीस हवालदार शशिकांत गोविलकर यांनी सहकार्य केले.

विशेष व सत्र न्यायाधीश यु.टी. पोळ यांनी घटनेतील गुन्ह्याच्या शाबितीनंतर आरोपीला दोषी ठरवून पाच वर्षे सत्ता मजुरी व १५०० रुपये दंड ठोठावला आहे.


**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड
**जाहीर सूचना**

**पनवेल महानगरपालिका क्षेत्रात शहरी आरोग्यवर्धिनी उपकेंद्र (UHWC) करीता जागा भाडेतत्वावर घेणेबाबत.**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात **शहरी आरोग्यवर्धिनी उपकेंद्र (UHWC)** करीता तळमजला अथवा तळमजला + पहिला मजला वरील जागा भाडेतत्त्वावर घेणेकामी मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका इच्छुक व्यक्ती/संस्था यांचेकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

सदरच्या जागा / इमारती या बांधकाम पूर्ण असलेल्या, वाहनतळ व शौचालय या सुविधांयुक्त असाव्यात.

| अ.क्र. | जागेचे ठिकाण | आवश्यक जागेचे क्षेत्रफळ |
|---|---|---|
| १) | आसुडगाव | १००० ते १२०० चौ. फुट |
| २) | साईनगर झोपडपट्टी, पनवेल | १००० ते १२०० चौ. फुट |

इच्छुक व्यक्ती/संस्था यांनी जागेचे ठिकाण, क्षेत्रफळ, भाडे इ. तपशीलासह अर्ज पनवेल महानगरपालिकेच्या pmcmalmatta2018@gmail.com मेलआयडी वर दिनांक ४ /०३/२०२४ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत जमा करावेत.

जा.क्र. पमपा/माव्य/३५२४/
प्र. क्र. ०२/१००/२०२४
दिनांक :- २३/०२/२०२४

**सही/-**
**उप आयुक्त,**
पनवेल महानगरपालिका



**पाहिजेत ! पाहिजेत !! पाहिजेत !!!**

**सिव्हिल कन्स्ट्रक्शन कंपनी**
GAIL INDI- LTD (उसर, अलिबाग) येथे RCC कामासाठी **स्टील बाइंडिंग आणि शटरिंगचे कंत्राटदार/ कारागीर** आवश्यक आहेत.

कृपया संपर्क साधावा :
**शिखर मो. नं. ९८१८४५७७१३**
ई.मेल आईडी-s.const0902@gmail.com


# कर्जतमध्ये पर्यटन विभागाच्या माध्यमातून विकासकामांचे भूमिपूजन

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषद हद्दीत नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या विशेष प्रयत्नातून पर्यटन विभागाच्या माध्यमातून आणलेल्या विकासकामांचे भूमिपूजन झाले.

मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या हस्ते आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रमुख उपस्थितीत नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांच्या अध्यक्षतेखाली कर्जत नगर परिषद हद्दीत भूमिपूजन झाले. या वेळी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, बांधकाम सभापती विवेक दांडेकर, पाणीपुरवठा सभापती वैशाली मोरे, मुख्याधिकारी वैभव गारवे, नगरसेवक राहूल डाळिंबकर, बळवंत घुमरे, उमेश गायकवाड, संकेत भासे, नगरसेविका प्राची डेरवणकर, पुष्पा दगडे, माजी नगरसेवक निलेश घरत, दीपक मोरे, नगर अभियंता मनीष गायकवाड आदी उपस्थित होते.

यामध्ये गुंडगे सायन्स पार्क, स्नेक पार्क उभारणे, सोमजाई मंदिर परिसर सुशोभिकरण, धापया महाराज मंदिर परिसर सुशोभिकरण करणे, १ व २ नंबर घाट संरक्षण भिंत बांधणे महावीर पेठ, बामचा मळा रस्त्याला कोपरा गार्डन विकसित करणे, दहिवली समाज मंदिर परिसर सुशोभिकरण, श्री राम मंदिर ते श्री विठ्ठल मंदिर रस्ता बांधकाम, दहिवली छोट्या पुलाजवळील घाट विकसित करणे या कामांचा समावेश आहे. घाट विकसित केल्यानंतर वंदनीय हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नदी संवर्धन प्रकल्प नाव देण्याचा ठराव नगर परिषदेत सर्वानुमते मंजूर केलेला आहे.



# मुरूड मजगाव मराठी शाळेची कृषी क्षेत्रभेट

**मुरुड : प्रतिनिधी**

राजिप मजगाव मराठी शाळेतर्फे आयरकर फार्मिंग हाऊस येथे क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते. या कृषी पर्यटनातून विद्यार्थ्यांना शेतीचे महत्व समजावे, हवामानातील बदल, पिकांची घ्यावयाची काळजी, वृक्षलागवड याबद्दल माहिती व्हावी यासाठी या कृषी पर्यटनाचे आयोजन केल्याचे शाळेचे मुख्याध्यापक हेमकांत लक्ष्मण गोयजी यांनी सांगितले.

या वेळी शालेय विद्यार्थ्यांना झाडांची लागवड, हवामान, मातीची वैशिष्ट्य, किटकनाशकांची फवारणी इ. विषयक माहिती आयरकर फार्मिंगचे मालक अजय आयरकर यांनी करून दिली. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निखील मानाजी, उपाध्यक्ष उमेश कोंडाजी सदस्य सरीता धसाडे, दीक्षा भोईर, पुजा भोईर, करूणा पाटील आदींनी सहकार्य केले.


**ग्रुप ग्राम पंचायत उसरोली कार्यालय**
ता. मुरूड, जि. रायगड. फोन नं. ०२१४४-२५२०८९

**निविदा सूचना**

ग्रुप ग्राम पंचायत उसरोली करीता मासिकसभा दि. ०९/०२/२०२४ ठराव क्रमांक २७ नुसार ग्रुप ग्राम पंचायत उसरोली कार्यालयतील रिक्त कार्यालयीन लिपीक पदी नियुक्ती करणेकामी इच्छूक पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**पात्रतेच्या अटी :-**
१) उमेदवार ग्राम पंचायत हद्दीतील असावा
२) शैक्षणिक पात्रता किमान पदवी उत्तीर्ण असावी,
(३) संगणक परिक्षा MS-CIT पास केलेली असावी
४) मराठी व इंग्रजी टायपिंग स्पीड ३० असावी
५) उमेदवाराचे वय २१ वर्षा पुढील असावे
६) संगणक क्षेत्रातील अनुभव किमान ५ वर्षा पर्यंत असावा तसे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.
७) मोटर सायकल चालविता येणे आवश्यक आहे.
८) अर्ज दिनांक २९/०२/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत स्विकारले जाईल.

**टिप :** ग्राम पंचायत हद्दीतील उमेदवार न मिळाल्यास बाहेरील उमेदवाराचा विचार केला जाईल.

दिनांक २२/०२/२०२४

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
ग्रुप ग्राम पंचायत उसरोली
मु. पो. उसरोली, ता. मुरूड

**सही/-**
**सरपंच**
ग्रुप ग्राम पंचायत उसरोली
मु. पो. उसरोली, ता. मुरूड



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे कोळोसे, ता. महाड, जि. रायगड येथिल खालील वर्णनाच्या मिळकती या आमचे अशिलांनी सदर मिळकतींचे मुळ मालकांकडून कायम स्वरूपात खूषखरेदीने घेण्याचे ठरविले आहे.

तरी सदर मिळकतींवर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, मृत्युपत्र, साठेकरार, पोटगी, चार्ज, ताबा-वहिवाट, इजमेंट, बोजा, तारण, वारसा, ट्रस्ट, कुळहक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०८ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे कागदपत्रे पुराव्यासहीत लेखी कळवावे. तशी कोणाचीही काणत्याही प्रकारची हरकत तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास मिळकतीवर कोणचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अगर अथवा तो असल्यास तो आमच्या अशिलांचे लाभांत सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली तक्रार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. याची कृपया सर्वांनी नांदे घ्यावी. कळावे.

**मिळकतींने वर्णन**

| सर्वे/ भूमापन नं. | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे | मालकाचे नांव |
|---|---|---|---|
| ५०/११ | ०-७६-०० | ०.२५ | श्री. आकाश प्रदीप घोंगे<br>श्री. प्रदीप पांडुरंग घोंगे<br>श्रीम. मेघा प्रदीप घोंगे |
| ५०/१३ | ०-२३-०० | ०.१२ | |
| ५०/१८ | ०-९५-०० | ०.९५ | |
| ५०/१९ | १-४८-०० | ०.०७ | |
| ५०/१ ब | ०-८०-०० | ०.४ | |
| ५०/६ | ०-१०-०० | ०.०६ | |
| ५०/७ | ०-४०-०० | ०.१४ | |
| ५०/८ | १-०७-०० | ०.५ | |
| ५०/९ | ०-३२-०० | ०.११ | |
| ५१/१० अ | ०-०३-०० | ०.०३ | |
| ५१/१८ अ | ०-७७-०० | ०.३२ | |
| ५१/१९ | ०-५७-०० | ०.२५ | |
| ५१/२० अ | ०-९७-०० | ०.३८ | |
| ५१/२१ | ०-४०-०० | ०.१२ | |
| ५१/२२ | १-२०-०० | ०.५ | |
| ५१/९ | ०-५४-०० | ०.२५ | |

ठिकाण - महाड
ता. २४/०२/२०२४

**सही/-**
**ॲड. स्वप्निल प्रभाकर ढवण**
**महाड-रायगड**
मो. नं. ८९८३२२९१११

## निवडक

### विजय आर्मी स्कूलमध्ये शिवजयंती



**पनवेल** : विजय आर्मी स्कूल अ‍ॅण्ड ज्युनिअर कॉलेज येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे प्राचार्य एम. के. मराठे होते. प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे ज्येष्ठ शिक्षक व्ही. जे. साळुंखे होते. प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीचे पूजन करण्यात आल. व्ही. के. ठाकरे यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यवस्थापन व प्रशासनाबद्दल परिपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना दिली. डी. बी. कोळी यांनीसुद्धा शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्रावर विचार मांडले. विद्यार्थ्यांनी लेझीम नृत्य सादर केले, तसेच निबंध स्पर्धा व भाषण स्पर्धा घेण्यात आली. शासकीय क्रीडा स्पर्धांचे प्रमाणपत्र प्राचार्य एम. के. मराठे व सर्व मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. बी. पवार यांनी केले. उपप्राचार्य एस. पी. पाटील, शिक्षक, सैनिक निदेशक, कर्मचारी उपस्थित होते. आभार प्रदर्शन नेरुळकर मॅडम यांनी केले.

### हातातील मोबाईल हिसकावून पसार

**पनवेल** : लघुशंका करत असताना अनोळखी चोरट्याने ३२ वर्षीय व्यक्तीच्या हातातून मोबाईल चोरून नेल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सजारूल सोफिजुद्दीन शेख हे लक्ष्मी हॉस्पिटल पनवेल येथे राहत असून ते त्या ठिकाणी झोपले होते. रात्री रस्त्याच्या पलिकडे लघुशंका करण्यासाठी निघाले असता त्यांनी मोबाईलची फ्लॅश लाईट चालू करून मोबाईल हातात पकडल्यावर रस्ता ओलांडू लागले. या वेळी एका अनोळखी व्यक्तीने शेख यांच्या हातातील मोबाईल जबरीने खेचला आणि तो उरण नाका बाजूकडे रस्त्याने पळून गेला. त्याचा पाठलाग केला मात्र तो अंधाराचा फायदा घेऊन पळून गेला.

### संत गाडगेबाबा यांना अभिवादन

**नवी मुंबई** : नवी मुंबई महापालिकेच्या वतीने मुख्यालयात अ‍ॅम्फिथिएटर येथे संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त तथा स्वच्छ भारत मिशनचे नोडल अधिकारी डॉ. बाबासाहेब राजळे यांच्या हस्ते पुष्पमालिका अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. या वेळी प्रशासकीय अधिकारी उत्तम खरात, संजीव पवार, रवि जाधव तसेच इतर अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.


### लोकमान्य टिळक वाचनालयास पुस्तके



**पनवेल** : आदर्श शिक्षक कै. गजानन गणू खारपाटील यांच्या स्मृतीप्रित्यर्थ, त्यांचे कनिष्ठ पुत्र मिलिंद खारपाटील यांनी जागतिक मातृभाषा दिनाचे औचित्य साधून चौक येथील लोकमान्य टिळक वाचनालयास पुस्तके भेट दिली. ही पुस्तके त्यांनी ग्रंथपाल अभिजित चौधरी यांच्याकडे सुपूर्द केली.

### ‘केबीपी’च्या प्राचार्यपदी डॉ.शुभदा नायक

**नवी मुंबई** : रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर



भाऊराव पाटील कॉलेजच्या प्राचार्यपदी प्रो. डॉ. शुभदा नायक यांची निवड रयत शिक्षण संस्थेने नुकतीच केली. प्रो. डॉ. शुभदा नायक यांनी प्राचार्यपदाचा कार्यभार २० फेब्रुवारीपासून स्वीकारला आहे. प्रो. डॉ. शुभदा नायक यांच्या निवडीबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, संस्थेचे संघटक डॉ. अनिल पाटील, रयतचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, रायगड विभागाचे चेअरमन बाळाराम पाटील, सचिव विकास देशमुख, सहसचिव प्रिं. डॉ. ज्ञानदेव म्हस्के, सीडीसी सदस्य तसेच शिक्षक, शिक्षकेतर सेवकांनी त्यांचे अभिनंदन केले. प्रो. डॉ. शुभदा नायक यांनी मुंबई येथील भाभा अणुसंशोधन केंद्रातून, पद्मश्री प्रो. शरद काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सूक्ष्मजीवशास्त्र या विषयातून पीएच.डी. पदवी पूर्ण केली. त्यांना पदवी स्तरावर ३४ तर पदवीव्युत्तर पदवी स्तरावर १७ वर्षे अध्यापनाचा अनुभव आहे.

# मालमत्ता करवसुलीसाठी पालिकेची तयारी

## अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांची बैठकीतून आखणी

**नवी मुंबई : बातमीदार**

२०२३-२०२४च्या अर्थसंकल्पामध्ये महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत असणाऱ्या मालमत्ताकर वसुलीकडे महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष लक्ष दिल्याने मागील वर्षीच्या जानेवारी महिन्यातील ४१७.१८ कोटी रक्कम वसुलीच्या तुलनेत या आर्थिक वर्षात जानेवारी २०२४पर्यंत ५२० कोटी इतकी वसुली झालेली आहे. या वर्षी ८०० कोटी रकमेचे मालमत्ताकर वसुली उद्दीष्ट ठेवण्यात आले असून




अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांच्या नियंत्रणाखाली मालमत्ताकर विभागाच्या अधिकारी, कर्मचारी समुहाने मालमत्ताकर वसुलीवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे.

याबाबत नुकतीच आढावा बैठक घेत अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांनी आपले उद्दीष्ट साध्य होण्याच्या दृष्टीने प्रत्येकाने आपापल्या स्तरावर वसुलीचे नियोजन करावे व ते कालावधीची मर्यादा ठरवून ते साध्य करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करावेत, असे स्पष्ट निर्देश दिले. या वेळी त्यांनी थकबाकीदारांच्या रकमेची उतरत्या क्रमाने विभागवार यादी तयार करून प्रत्येक विभाग कार्यालयास लक्ष्य ठरवून दिले व याकडे बारकाईने नियमित लक्ष ठेवण्याचे निर्देश दिले. नोटीसींना प्रतिसाद न देणाऱ्या थकबाकीदारांवर पुढील कायदेशीर कारवाई करीत मालमत्ता जप्त करुन आवश्यकतेनुसार त्यांचा लिलाव करण्याची कार्यवाही करण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांनी दिले.

लिडार सर्वेक्षण पूर्ण झालेल्या मालमत्तांचे विभागामार्फत प्रत्यक्ष सर्वेक्षण करून मालमत्ताकराची डिमांड नोटीस देण्याबाबतही तत्पर कार्यवाही करण्याचे सूचित करण्यात आले. त्याचप्रमाणे भोगवटा प्रमाणपत्र प्रलंबित असलेल्या इमारती आणि एमआयडीसी क्षेत्र येथील मालमत्तांकडे प्राधान्याने लक्ष केंद्रीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या. अशाच प्रकारे गावठाण विभागात बांधलेल्या इमारतीतील घरांना स्वतंत्र मालमत्ताकर देयके वितरीत करून अधिकाधिक मालमत्ता या कराच्या कक्षेत येतील याकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

विविध अंगाने मालमत्ताकराची थकबाकी वसूली करण्यासोबतच करनिर्धारण झालेल्या नवीन मालमत्ता या मालमत्ताकराच्या कक्षेत येण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी व या माध्यमातून मालमत्ताकराचे लक्ष्य साध्य करण्यावर भर द्यावा अशाही सूचना अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांनी दिल्या.

## पत्नीच्या चेहऱ्यावर ॲसिड टाकून फरार झालेला पती ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

बहिणीकडे हैदराबादला जाऊया असे पतीने वारंवार सांगूनसुद्धा पत्नी त्याचे ऐकत नसल्याने यातून त्यांच्यात झालेल्या भांडणातून पतीने रागाच्या भरात पत्नीच्या चेहऱ्यावर ॲसिड टाकून फरार झालेल्या पतीस तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



रमजान सिद्दीक गाझी (वय २८, रा.खैरणे) याने त्याची पत्नी अमीना (वय २८) हिला त्याच्या बहिणीकडे हैदराबादला राहण्यास जाऊ या कारणावरून सतत भांडण करून तिच्या चेहऱ्यावर ॲसिड टाकून तिला गंभीररित्या जखमी करून तो पसार झाला होता. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात दाखल होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक हर्षल राजपूत, पोलीस हवालदार सतीश तांडेल, पोलीस शिपाई राजकुमार सोनकांबळे, पोलीस शिपाई भीमराव खताळ आदींच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या सहाय्याने सखोल तपास करून आरोपीला पनवेल रेल्वे परिसरातून ताब्यात घेतले आहे.

## गुन्हे शाखेकडून ५० लाखांचे ड्रग्ज जप्त

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा येथून गुन्हे शाखा पोलिसांनी ५० लाखांचे ड्रग्ज जप्त करून एकाला अटक केली आहे. त्याच्यावर तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

अटक केलेला तरुण डोंबिवलीचा राहणारा असून ड्रग्ज पुरवण्यासाठी त्या ठिकाणी आला होता. पेंधर परिसरात एक जण ड्रग्स विक्रीसाठी येणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती. त्यावरून वरिष्ठ निरीक्षक नीरज चौधरी यांनी सहाय्यक निरीक्षक नीलेश धुमाळ, उपनिरीक्षक कुलदीप मोरे, उत्तम लोखंडे, संजय फुलकर आदींच्या मदतीने बुधवारी पेंधर येथील पुलालगत सापळा रचला होता.

तेथे आलेल्या एकावर संशय आल्याने त्याला ताब्यात घेतले होते. झडतीमध्ये पिशवीत ५०० ग्रॅम मेफेड्रॉन (एमडी) हा ड्रग्ज आढळले. बाजारभावानुसार त्याची किंमत ५० लाख रुपये आहे. याप्रकरणी अरशद करार खान (२८) याला अटक करून तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## उरणमधील एनएमएमटी बससेवा बंद

**उरण :** उरणला जोडणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिकेची ३१ व ३० क्रमांकाच्या एनएमएमटीची बससेवा शुक्रवारपासून पूर्ण बंद करण्याचा निर्णय व्यवस्थापनाने घेतला आहे. त्यामुळे या बसने प्रवास करणाऱ्या हजारो प्रवाशांना याचा फटका बसणार आहे.

उरणमध्ये कोपरखैरणे ते उरण ही ३१ तर कलंबोली ते उरण या मार्गावरील ३० या दोन क्रमांकाच्या बस सुरू आहेत. या बसमधून दिवसाला सात हजारांपेक्षा अधिक प्रवासी प्रवास करीत होते. ४२ बसच्या एकूण १२० फेऱ्या या मार्गावर चालविण्यात येत होत्या. या बसमुळे उरणच्या नागरिक, विद्यार्थी आणि चाकरमानी यांच्या प्रवासासाठी महत्त्वाची सेवा बनली आहे, मात्र काही दिवसांपूर्वी झालेल्या अपघातानंतर ही सेवाच आता बंद करण्याचा निर्णय एनएनएमटी व्यवस्थापनाने घेतला आहे.

## वाशीत उत्सव मराठी भाषेचा, सुलेखन संस्कृतीचा

**नवी मुंबई : बातमीदार**

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने सातत्याने विविध उपक्रम राबविले जातात. याच अनुषंगाने २७ फेब्रुवारी रोजीच्या मराठी भाषा गौरव दिनानिमित्त अच्युत पालव स्कूल ऑफ कॅलिग्राफी यांच्या सहयोगाने सुलेखनातून मराठी भाषेचा गौरव वाढविणारा विशेष उपक्रम वाशी येथील मध्यवर्ती छत्रपती शिवाजी महाराज चौकात राबविला जात आहे.

नवी मुंबईचे भूषण असणारे जगप्रसिध्द सुलेखनकार अच्युत पालव यांच्या मार्गदर्शनाखाली हे सुलेखन प्रदर्शन २४ ते २८ फेब्रुवारीपर्यंत वाशी येथील शिवाजी महाराज २४ तास खुले राहणार असून शनिवारी (दि.२४) सायंकाळी ५.३० वाजता या प्रदर्शनाचा उद्घाटन सोहळा होणार आहे. या प्रदर्शनाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अच्युत पालव स्कूल ऑफ कॅलिग्राफी यामधील सुलेखनकार शनिवार २४ फेब्रुवारी रोजी व रविवार २५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ ते ८ या वेळेत सुलेखन प्रात्यक्षिके सादर करणार आहेत.

उत्सव मराठी भाषेचा या सुलेखन प्रदर्शनात मराठी भाषेतील वाचनीय कथा, कविता, विचार यांचे सुलेखनातून प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. या प्रदर्शनात अच्युत पालव स्कूल ऑफ कॅलिग्राफीच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या ४० कलाकृती मांडण्यात येणार असून सुप्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे, कुसुमाग्रज, ना. धों. महानोर, इंदिरा संत, शांताबाई शेळके अशा नामवंत कवींच्या कविता व वाचनीय साहित्य सुलेखनातून पाहण्याची संधी रसिकांना उपलब्ध होणार आहे.

## दोन ठिकाणी घरफोडी करणाऱ्या अल्पवयीन मुलास अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका परिसरात दोन ठिकाणी घरफोडी करणाऱ्या एका अल्पवयीन मुलास पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

तालुक्यातील वावंजे गाव परिसरात असलेल्या दोन वेगवेगळ्या घरात एका अल्पवयीन मुलाने घरफोडी करून मोठ्या प्रमाणात रोख रकमेसह इतर ऐवज चोरून नेला होता. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल होताच, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि. संजय गळवे, हवालदार विजय देवरे, महेश धुमाळ, सुनील कुदळे, पोशि. आकाश भगत आदींच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराच्या सहाय्याने सखोल तपास करून सदर आरोपीला ताब्यात घेतले आहे.

## तळोजा औद्योगिक क्षेत्रात सुरक्षा सप्ताह

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तळोजा औद्योगिक क्षेत्रातील हायकल कंपनीने आपल्या सर्व साईट्सवर सुरक्षितता-केंद्रित संस्कृती वाढवण्याच्या निर्धाराने ५३वा सुरक्षा सप्ताह साजरा केला. आठवडाभर चाललेल्या या सोहळ्यात हायकलच्या तळोजा प्लांटमधील २००हून अधिक कर्मचाऱ्यांचा उत्साहपूर्ण सहभाग होता.

सुरक्षा सप्ताहात सुरक्षेचे प्रोटोकॉल बळकट करण्यासाठी आणि सुरक्षित कामाचे वातावरण राखण्यासाठी सामुहिक जबाबदारीची भावना वृद्धिंगत करण्यासाठी आकर्षक कार्यक्रम आणि विविध प्रकारचे उपक्रम राबविण्यात आले. संवादात्मक कार्यशाळांपासून सुरक्षेशी निगडीत कामे आणि ज्ञानप्रवण सत्रांपर्यंत, कर्मचारी सक्रियपणे सुरक्षा जागरूकता वाढवण्यासाठी आणि दक्षतेच्या संस्कृतीला प्रोत्साहन देण्यात आले.

हायकलचे मनुष्यबळ विकास विभाग अध्यक्ष रतीश झा यांनी, हायकलमध्ये सुरक्षितता ही केवळ एक प्राधान्याची गोष्ट नाही, तर ती आमच्या ओळखीचा आणि कामकाजाचा एक अविभाज्य भाग आहे. सुरक्षित कामाची जागा ही केवळ प्रोटोकॉल आणि प्रक्रियांबद्दल नसते. जिथे प्रत्येक व्यक्तीच्या मानसिकतेला दक्षता आणि जबाबदारी यांच्या संस्कृतीत सक्रियपणे योगदान देण्याबद्दल चालना मिळते ती सुरक्षित कामाची जागा असते हे आम्ही जाणतो. आमचे कर्मचारी ही आमची सर्वांत मौल्यवान संपत्ती आहे आणि त्यांच्या कल्याणाबाबत तडजोड होऊच शकत नाही यावर आमचा विश्वास आहे. सुरक्षेप्रती असलेली बांधिलकी यातूनच आली आहे. सुरक्षा सप्ताहासारख्या उपक्रमांद्वारे ही बांधिलकी बळकट करणे आणि सुरक्षा-जागरूक पिढी घडविणे हे आमचे ध्येय आहे. प्रत्येक उपक्रम, कार्यशाळा आणि संवाद आम्ही करीत असलेल्या प्रत्येक गोष्टीत सुरक्षिततेला प्राधान्य देण्याच्या आमच्या सामूहिक जबाबदारीची आठवण करून देतो, असे म्हणाले.



# सिडकोमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

सिडकोमध्ये शिवजयंती सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. सिडको एम्प्लॉईज युनियनतर्फे शिवजयंती सोहळ्याचे गुरुवारी (दि.२२) आयोजन करण्यात आले होते.

या वेळी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिल डिग्गीकर, सहव्यवस्थापकीय संचालक शांतनु गोयल, डॉ. कैलास शिंदे, दिलीप ढोले, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, महाव्यवस्थापक (कार्मिक) फैय्याज खान, अध्यक्ष सिडको एम्प्लॉईज युनियन विनोद पाटील, सरचिटणीस जे. टी. पाटील, अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.





कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धपुतळ्याचे पूजन करून व पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून झाली. अनिल डिग्गीकर यांनी, छत्रपती शिवाजी महाराजांनी आलेल्या संकटांवर धैर्याने मात करून स्वराज्य निर्माण केले. यामुळे शिवचरित्र हे नवीन भारत घडवण्यासाठी आपणा सर्वांना प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाच्या अखेरीस सादर करण्यात आलेल्या प्रभो शिवाजी राजा या छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित संगीतमय नाट्यकृतीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

## ए.आय. काळसेकर टेक्निकल कॅम्पसमध्ये मेगा स्पोर्ट्स, कल्चरल फेस्ट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमधील ए. आय. काळसेकर टेक्निकल कॅम्पसमध्ये १३ ते १७ फेब्रुवारीदरम्यान बोनहोमी २०२४ स्पोर्ट्स आणि कल्चरल फेस्ट आयोजित करण्यात आला होता. या फेस्टमध्ये सुमारे ४३ क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. वरिष्ठ पीआय उमेश गवळी यांच्या उपस्थितीत उद्घाटन समारंभ झाला.



या फेस्टमध्ये विद्यार्थ्यांनी ॲथलेटिक्सपासून क्रिकेट आणि मुशायरापर्यंत विविध स्पर्धांमध्ये त्यांची प्रतिभा आणि खिलाडू वृत्तीचे प्रदर्शन केले. या फेस्टच्या समारोप कार्यक्रमासाठी जीएसटी-कल्याणचे उपायुक्त गणेश दळवी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी सहभागींच्या कामगिरीचे कौतुक केले. पनवेल नगरपालिका माजी नगराध्यक्ष सईद मुल्ला, खालापूरचे तहसीलदार व तालुका कार्यकारी दंडाधिकारी आयुब तांबोळी हे उपस्थित होते.

डॉ. नुसरथ जुनैदी आणि डॉ. शाहबाजुल हक यांच्या नेतृत्वाखालील विद्यार्थी परिषदेने फेस्टचे आयोजन केले. अंजुमन-इ-इस्लामचे अध्यक्ष डॉ. झहीर काझी, नवी मुंबई संस्थेच्या बोर्डाचे कार्यकारी अध्यक्ष बुरहान हरीस, कॅम्पस डायरेक्टर डॉ. रमजान खाटीक यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. शारिक सय्यद, डॉ. राजेंद्र मगर आणि प्रा. राज म्हात्रे यांच्यासह विविध शाळांचे डीन आणि एचओडी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मोलाची भूमिका बजावली.

# पोलादपूर शहर भाजप आणि महिला मोर्चाची कार्यकारिणी जाहीर

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर शहर महिला मोर्चाच्या अध्यक्ष उज्ज्वला शेठ यांनी महिला मोर्चा कार्यकारिणी जाहिर केली. यानंतर पोलादपूर शहर भाजप अध्यक्ष राजाभाऊ दिक्षित यांनीदेखील शहर भाजपची कार्यकारिणी जाहीर केली आहे.

भाजप पोलादपूर शहर महिला मोर्चा कार्यकारिणीमध्ये शहर सरचिटणीस कलिका अधिकारी, योगिता भागवत, उपाध्यक्ष तनुजा भागवत, वैशाली जोशी, अर्चना शेठ, चिटणीस शिल्पा शिंदे, नयना शेठ, शिला बुटाला, शहर सदस्या कायम निमंत्रित दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष रचना धुमाळ, नगरसेविका अंकिता जांभळेकर निकम, सदस्या सपना बुटाला, जान्हवी तलाठी, उज्ज्वला शेठ, निला तलाठी, अस्मिता पवार, वैशाली गणेश शेठ, जयश्री पवार, सोनिया शेठ, मृणाल शेठ, प्रवेशा घोसाळकर, विशाखा आंबेतकर, रश्मी दिक्षित, प्रज्ञा सुर्वे, अनुसया पटेल आदींची नियुक्ती कार्यकारिणीच्या यादी जाहीर करण्यात आली आहे.

शहर कार्यकारिणीमध्ये उपाध्यक्ष गणेश शेठ, मनोज मोरे, शहर चिटणीस अमित तलाठी, प्रतिक सुर्वे, शहर चिटणीस सचिन बुटाला, गणेश मोरवणकर, युवा शहर अध्यक्ष जयेश जगताप, शहर सोशल मिडीया संयोजक किशन सिंह, शक्ती केंद्र प्रमुख समाधान शेठ, गुजराती सेल अध्यक्ष राजीव शेठ, पोलादपूर शहर कायम निमंत्रित सदस्य मनोज भागवत, प्रसन्ना पालांडे, सचिन शेठ, राजन धुमाळ, निलेश आंबेतकर, एकनाथ कासुर्डे, पंकज बुटाला, शहर कार्यकारिणी सदस्य डॉ. घन:श्याम शेठ, उदय खरे, अमोल भागवत, निरंजन मोरे, महेश निकम, प्रशांत जगताप, मनोज पवार, अनिल पवार, नितीन घोसाळकर, मिलींद सागवेकर, अमित गद्रे, मंगेश शिंदे, नवनाथ कासुर्डे, संतोष कासार आदींची निवड झाल्याचे अध्यक्ष राजाभाऊ दिक्षित यांनी प्रसिध्दीस दिलेल्या कार्यकारिणीच्या यादीमध्ये नमूद केले आहे.

तालुक्यात आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीमध्ये भारतीय जनता पक्षाच्या वरिष्ठांकडून आलेल्या आदेशानुसार पक्षाची ध्येयधोरणे अमलात आणण्यासाठी सर्व कार्यकारिणी सदस्य कटिबद्ध असल्याचे या वेळी पोलादपूर शहर अध्यक्ष राजाभाऊ दिक्षित यांनी सांगितले.

# रोह्यातील म्हाडा अंतर्गत रस्त्यांसाठी निधी उपलब्ध करून देणार –मंत्री तटकरे

**रोहे : प्रतिनिधी**

मराठा समाजबांधवांनी मराठा भवनाचे स्वप्न पाहिले होते. समाजाच्या एकजुटीने व प्रयत्नातून आज मराठा समाजाचे भवन उभे राहिले आहे. दोन वर्षांच्या कालावधीत आम्ही उभे करु शकलो याचा आम्हाला आनंद होत आहे. म्हाडामधील काही रस्ते झाले आहेत, परंतु अंतर्गत रस्त्यांची आवश्यकता असून तसा प्रस्ताव तयार करा. त्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिले.



रोहा अष्टमी नगर परिषदेच्या शहरातील विविध कामांचे भूमिपूजन मराठा समाज भवन म्हाडा वसाहत येथे करण्यात आले. त्या वेळी त्या बोलत होत्या. कार्यक्रमास मुख्याधिकारी पंकज भुसे, माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, रत्नप्रभा काफरे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष अमित उकडे, सकल मराठा समाज अध्यक्ष प्रदीप देशमुख, ज्येष्ठ नेते प्रकाश शिंदे, मराठा समाज महीला मंडळ अध्यक्षसरोजीनी शिंदे, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, अहमद दर्जी, समीर सकपाळ, मयुर दिवेकर, रमेश साळवी, सुजाता चाळके, प्राजक्ता चव्हाण, स्नेहा आंबरे, शिल्पा धोत्रे, रवी चाळके, जालिंदर शेवाळे, निलेश शिर्के, दिपक देशमुख, संकेत देशमुख , मयुर पायगुडे, राजु जाधव आदी उपस्थित होते.

शहरात धावीर प्लाझा सोसायटी अंतर्गत काँक्रिटीकरण करणे, साई मल्हार चौक धनगर आळी–नगर परिषद ते वीर सावरकर रोड–राममंदिरापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे, म्हाडा वसाहत येतील वुमन्स क्लब परिसर सुशोभीकरण करणे, मराठा समाज भवन परिसर सुशोभीकरण करणे आदी कामांचे भूमिपूजन करण्यात आले.

अमित उकडे यांनीही विचार मांडले. प्रास्ताविक मुख्याधिकारी भुसे यांनी, तर सूत्रसंचलन व आभार प्रतिक राक्षे यांनी व्यक्त केले.

# नांदगाव हायस्कूलमध्ये करिअर मार्गदर्शन शिबिर




**मुरूड : प्रतिनिधी**

श्री कॉम्पुटर व श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंत नगर नांदगाव हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने हायस्कूलमधील इयत्ता दहावीतील शालेय विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ इयत्ता दहावीतील १०३ विद्यार्थ्यांनी घेतला आहे.

इयत्ता दहावी पास झाल्यावर कोणते व्यवसायिक कोर्स आहेत याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती करून देण्यात आली. बारावीनंतरसुद्धा विविध कोर्स घेऊन इंजिनिरिंग करता येते यासाठी जास्तीत जास्त मुलांनी दहावी पास झाल्यावर विज्ञान शाखेची निवड करावी असे यावेळी सांगण्यात आले. विविध कोर्सची माहिती चलचित्राद्वारेसुद्धा देण्यात आली.

या शाळेचे सहाय्यक शिक्षक प्रतीक पेडणेकर यांनी विशेष मार्गदर्शन करताना सांगितले की, ज्या क्षेत्रात विद्यार्थ्यांना आवड आहे तेच क्षेत्र निवडून आपला भविष्यकाळ उज्ज्वल करावा. व्यावसायिक शिक्षणाची निवड करताना कोणताही दबाव बाळगू नका. तुम्हाला जे आवडते ते स्वीकारा व त्या कोर्समध्ये चांगले मार्क मिळून नोकरी मिळवा.

मुख्याध्यापक श्रीधर ओव्हाळ यांनीसुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

उपक्रमास पर्यवेक्षिका अर्चना खोत, शिक्षक प्रतिनिधी महेश वाडकर, प्रतीक पेडणेकर, श्री कॉम्पुटरच्या संचालिका पूर्वा पेडणेकर, सागर राऊत, राहील घलटे आदी उपस्थित होते.

# खोपोलीतील क्रिकेटपटूची कर्णधारपदावरून गच्छंती

## जिल्हा असोसिएशनकडून शिस्तभंगाची कारवाई

**खोपोली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या निकुंज विठ्ठलानी याला शिस्तभंगाची कारवाई म्हणून कर्णधार पदावरून काढून टाकण्यात आले आहे. या प्रकाराची खोपोलीत चर्चा सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा वरिष्ठ खेळाडूचा संघ पुणे येथे आमंत्रित साखळी स्पर्धेचे सामने सध्या खेळत आहे. त्या संघाचे नेतृत्व खोपोलीचा खेळाडू निकुंज विठ्ठलानी करीत आहे. निकुंज १७ व १८ फेब्रुवारीदरम्यान खोपोली क्रिकेट असोसिएशन आयोजित राज्यस्तरीय सामन्यात खेळण्यास खोपोली येथे आला असता त्यावर रायगड क्रिकेट असोसिएशनने



शिस्तभंगाची कारवाई म्हणून कर्णधार पदावरून तत्काळ काढून टाकण्यात येत असल्याचे दूरध्वनीवरून कळविले.

या कारवाईविरोधात खोपोली क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष यशवंत साबळे व सचिव अविनाश तावडे यांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त भविष्यात आपण स्वतः रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या कारभारात लक्ष घालणार असून आलेली मरगळ दूर करणार असल्याचे सांगितले.

> **या कारवाईबाबत माझ्यासह अनेक सदस्यांनाही माहिती नाही. जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष रजेवर असताना कोणाला अधिकार दिले होते. या निलंबनाबाबत जिल्हा क्रिकेट असोशिएनमध्ये कुठलाही ठराव झाला नाही. याबाबत आम्ही अनभिज्ञ आहोत.**
> **–राजेश पाटील, सदस्य, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन**

# मोरे फाउंडेशन स्कूलमध्ये नागरी संरक्षणाचे प्रशिक्षण

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील धाटाव येथील एम. बी. मोरे फाउंडेशन इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये एक्सेल इंडस्ट्रीज लिमिटेड, रोहा व औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने नागरी संरक्षण या विषयवार प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. या प्रशिक्षणात आत्मसंरक्षण व इतरांचे संरक्षण आपत्तीच्या वेळेत कसे करावे तसेच आपत्ती व्यवस्थापनाचे उत्कृष्ट सादरीकरण व प्रात्यक्षिक डेप्युटी चीफ कंट्रोलर ऑफ सिव्हिल डिफेन्स (उरण) एम. के. म्हात्रे यांनी दिले.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना उत्तम मार्गदर्शन व प्रशिक्षण देण्यात आले. यासाठी म्हात्रे आणि डेप्युटी डायरेक्टर औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय महाराष्ट्र शासन सुनील ठाकरे, समवेत हेड ऑफ एक्सेल इंडस्ट्रीज लिमिटेड सुदाम कापरे व सहकारी जयवंत गोळे, फायर ऑफिसर कमलाकर कदम उपस्थित होते.

फाउंडेशनचे सदस्य अशोक मोरे यांच्या उपस्थितीमध्ये तसेच स्कूलच्या प्राचार्य नंदिनी जोशी यांच्या अंतर्गत कार्यक्रम झाला. सूत्रसंचालन रोहन पाटील यांनी केले. शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यक्रमास सहकार्य केले.

# भाटे विद्यालयात विद्यार्थी-पालक मेळावा उत्साहात; मान्यवरांकडून मार्गदर्शन

**माणगाव : प्रतिनिधी**

मानगड परिसर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित एस.के.भाटे माध्यमिक विद्यालय बोरवाडी येथे मानगड परिसर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष नितीन पवार यांच्या उपस्थितीत विद्यार्थी–पालक मार्गदर्शन मेळावा झाला.

या मेळाव्यास प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. शीतल धडके (गुणे हॉस्पिटल, पनवेल), महेश पाटील (नवी मुंबई, पोलीस), प्रवीण ओटवकर (स्पोर्ट कोच), राजेश जोरकर (आशीर्वाद लॅब, माणगाव), शरद भद्रिके(चेअरमन, स्वराज्य फाउंडेशन, मुंबई), स्वरा म्हामुणकर (स्वदेश फांऊंडेशन, लोणेरे) हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

एस.के भाटे विद्यालयाने पालक संपर्क व जागृती या उद्देशाने हा मेळावा आयोजित करून नवीन शैक्षणिक उपक्रम सुरु केला आहे. संस्थेचे पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक ए.आर.कुशिरे व शिक्षकवृंद यांनी मान्यवरांचे सन्मानचिन्ह व गुलाबपुष्प देऊन स्वागत केले.



एनएमएमएस शालेय राष्ट्रीय शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षेत पास झालेले विद्यार्थी, शासकीय चित्रकला इंटरमिजीएट ग्रेड परीक्षा व तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनामध्ये दिव्यांग गटात द्वितीय क्रमांकप्राप्त या विशेष प्राविण्य मिळविलेल्या सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले.

विद्यार्थी–पालक मार्गदर्शन मेळाव्याचे प्रास्ताविक नवनिर्वाचित चेअरमन संतोष पवार यांनी केले. प्रमुख मार्गदर्शक शीतल धडके यांनी उद्बोधक मार्गदर्शन करताना पाल्याचा आहार, सवयी व पाल्याविषयी घ्यावयाची काळजी, जबाबदारी या विषयी मार्गदर्शन केले. महेश पाटील यांनी आपल्या मार्गदर्शनात सायबर क्राईम कसा होतो? मोबाईलचा वापर काळजीपूर्वक कसा करावा या विषयी सविस्तरपणे मार्गदर्शन केले.

प्रवीण ओटवकर यांनी जीवनातील खेळाचे महत्त्व व खेळामध्ये करिअर कसे बनविता येईल या विषयी उत्तमरित्या मार्गदर्शन केले. राजेश जोरकर यांनी व्यावसायिक क्षेत्राचे जीवनातील महत्त्व विषद केले, तर शरद भद्रिके यांनी बँकींग क्षेत्रात हिरीरीने सहभागी होण्यासाठी आवाहन केले. स्वदेश फाउंडेशनच्या शिक्षिका स्वरा म्हामुणकर यांनी फाउंडेशनचे कार्य व शैक्षणिक क्षेत्रातील विविध उपक्रमांची माहिती दिली.

अध्यक्षीय मनोगतात कार्यक्रमाचे व संस्थेचे अध्यक्ष नितीन पवार यांनी मार्गदर्शकांनी केलेल्या मार्गदर्शनाचे आचरण करावे व पाल्याच्या प्रगतीसाठी जागरुक रहावे, असे पालकवर्गाला आवाहन केले.

शेवटी संस्थेचे कार्यवाह संतोष रणपिसे यांनी सभागृहाला उद्देशून उद्बोधक मार्गदर्शन केले व आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाचे सहशिक्षक तुषार बगडे यांनी केले.

# आदिवासी शेतकऱ्याकडून चढावावरील शेतात पाणी आणून भाजीपाला लागवड

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील खांडस ग्रामपंचायतमधील पेटारवाडी येथील आदिवासी शेतकऱ्याने तब्बल पाचशे मीटर अंतरावरून पाणी आणून भाजीपाला शेती केली आहे. पोश्री नदीमधून पाणी उचलून ते पाणी आपल्या शेतात आणून काकडी आणि काही भाज्यांचे पीक यांची लागवड केली आहे. वारघडे दाम्पत्य यांच्याकडून ही शेती केली जात असून उदरनिर्वाहाचे साधन असल्याने शेतकरी कुटुंब त्याच ठिकाणी वस्ती करून शेतीची राखणदेखील करीत आहेत.



पेटारवाडी येथील वसंत कान्हू वारघडे हे आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालावा यासाठी आपल्या भाजीपाला शेती करीत असतात. त्यांच्या शेतापासून पोश्री नदी साधारण ५०० मीटर अंतरावर आहे, मात्र नदीपासून शेताचा भाग हा तीव्र चढवला असल्याने पाणी शेतात आणण्यासाठी अधिक इंधन खर्च करावे लागते. तरीदेखील वसंत आणि आशा वारघडे या कुटुंबाकडून भाजीपाला शेती केली जाते. तेथील एक एकर जमिनीवर वारघडे यांनी काकडीची शेती केली आहे. त्याचवेळी चवळी, झेंडूची फुले यांचीदेखील शेती त्यांनी केली असून काकडीचे नाझिया जातीचे बियाणे वापरले आहे. या बियाणांपासून अवघ्या ४१ दिवसांत काकडीचे पीक शेतीतून मिळू लागले आहे. या शेतीमधून दिवसाआड काकडीचे उत्पादन काढले जात असून याची विक्री मुरबाड येथे केली जाते. त्यासाठी वसंत वारघडे यांचे भाऊ हे मुरबाड येथून भाजी घेऊन जाण्याचे काम करतात.

या शेतीसाठी पाणी आणण्यासाठी मोठा खर्च वसंत वारघडे यांना सोसावा लागत आहे. त्यात डिझेल पंपासाठी दिवसाआड आठशे रुपये खर्च येत असून काही विघनसंतोषी लोकांकडून पाईपलाईन तोडण्यात आल्यावर वेगळा खर्च करावा लागतो, तर भाजीपाला पिकाची चोरीदेखील होण्याची भीती असल्याने कुटुंबाबातील एका व्यक्तीला तेथे थांबून राखण करावी लागते. त्यामुळे भाजीपाला शेती वारघडे कुटुंब आपल्या कुटुंबातील मुलासारखे सांभाळून कुटुंब चालविण्यासाठी पैसे उभे करीत आहे. त्यांनी आणलेले पाचशेहून अधिक मीटरवरून पाणीदेखील त्यांच्या मेहनतीचे उत्तम उदाहरण असल्याचे स्थानिक शेतकरी बोलत आहेत.

# श्रीरंग मोरे यांचा सन्मान

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील तालुका कृषी कार्यालयामधील पर्यवेक्षक श्रीरंग मोरे यांना रायगड जिल्हा कृषी विभागातर्फे सन्मानित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासन कृषी विभागामार्फत सन २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे करण्यात आले. पोलादपूर तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात विविध कार्यक्रम राबविण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने पौष्टिक तृणधान्य जनजागृती सभा, प्रभातफेरी, चित्रकला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, निबंध स्पर्धा, महिला हळदीकुंकू व पाककला स्पर्धा, पथनाट्य, ड्रोनद्वारे फवारणी प्रात्यक्षिक, शास्त्रज्ञ भेट आदींचा समावेश होता. या कामाची दखल घेत कोकण विभागीय कृषी सहसंचालक यांनी ठाणे येथे आयोजित कार्यक्रमात त्यांना सन्मानित केले.

# दहिवली गाव परिसर विचार मंचच्या माध्यमातून नदी स्वच्छता अभियान



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहराच्या मध्यवर्ती ठिकाणाहून वाहणारी उल्हास नदीत कचरा साठल्याने दहिवली गाव परिसर विचार मंचच्या माध्यमातून नदी स्वच्छता अभियान करून उल्हास नदीची स्वच्छता करण्यात आली. या वेळी दहिवली परिसरातील अनेकांनी सहभाग घेऊन उल्हास नदी स्वच्छ केली.

गिरीश सुर्वे, शाम देशमुख, बाळा रामाणे, महेंद्र महाडिक हे नदीमध्ये उतरुन या मावळ्यांनी नदीमधील कचरा गोळा केला. या मोहिमेसाठी नगरपालिका कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. हॅन्डग्लोज, मास्क, घमेली, पंजा व जेसीबीच्या सहाय्याने नदी स्वच्छ करण्यात आली.

या अभियानात विकास चित्ते (बापू), सुनील जाधव, अतुल पवार, दिनेश कडू, मल्हारी माने, मधूकर सुर्वे,नगरसेवक संकेत भासे, विजय जिनगरे, सुशांत,कुणाल बर्वे, महेन्द्र कर्वे (भाऊ), सचिन खैरे, मिलिंद चिखलकर, भरत बामणे, राहुल गायकवाड,महेंद्र तेरेदेसाई, पप्पू वडदकर, आप्पा कारूळकर, भाऊ खानविलकर, संजय देशमुख, कुमार निमकर, प्रकाश जाधव, गणेश कनोजे, जयेश घरत, दीपक बामणे, प्रकाश थोरवे, तिर्थेश शिंदे, शशीकांत कांबळे, संजय चंदने, विशाल दांडेकर, रमाकांत जाधव तसेच महिला भगिन शुभांगी कडू, पूनम शिर्के, अपर्णा चव्हाण यांनी सहभाग घेतला, तर नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांनी भेट दिली.

# रूटच्या शतकाने इंग्लंडला सावरले

## भारताविरुद्ध चौथ्या कसोटीत पहिल्या दिवसअखेर ७ बाद ३०२ धावा




**रांची : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड संघांतील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील चौथा सामना रांची येथे खेळला जात आहे. या सामन्याच्या पहिल्या दिवसअखेर इंग्लंडने जो रूटच्या शतकाच्या जोरावर ७ बाद ३०२ धावा केल्या आहेत. रूट १०६ धावा करून, तर ओली रॉबिन्सन ३१ धावा करून क्रीजवर आहे. या सामन्यात भारताकडून पदार्पणवीर आकाश दीपने सर्वाधिक तीन विकेट्स घेतल्या.

पहिल्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर इंग्लंडने सात गडी गमावून ३०२ धावा केल्या आहेत. रॉबिन्सन आणि रूट यांच्यामध्ये ५७ धावांची भागीदारी झाली आहे. पहिले सत्र भारताच्या नावावर होते. आकाश दीपच्या तीन विकेट्सने इंग्लंडच्या आघाडीच्या फळी उखडून टाकली. त्याने बेन डकेट (११), ऑली पोप (०) आणि जॅक क्रोली (४२) यांना पॅव्हेलियनमध्ये पाठवले. यानंतर अश्विनने जॉनी बेअरस्टोला पॅव्हेलियनमध्ये, तर रवींद्र जडेजाने बेन स्टोक्सला पॅव्हेलियनमध्ये पाठवून इंग्लंडचा अर्धा संघ पॅव्हेलियनमध्ये पाठवला. बेअरस्टोला ३८ आणि स्टोक्सला तीन धावा करता आल्या.

लंचपर्यंत पहिल्या सत्रात इंग्लंडने पाच विकेट गमावून ११२ धावा केल्या होत्या. यानंतर दुसऱ्या सत्रात म्हणजेच चहापानाच्या वेळेपर्यंत जो रूट आणि बेन फॉक्स यांनी एकही विकेट पडू दिली नाही. त्या सत्रात दोघांनी मिळून ८६ धावा जोडल्या. तिसऱ्या सत्रानंतर म्हणजेच चहाच्या वेळेनंतर सिराजने टीम इंडियाचे पुनरागमन केले. त्याने रूट आणि फॉक्सची ११३ धावांची भागीदारी मोडली. ज्यामुळे फॉक्सचे अर्धशतक हुकले. तो ४७ धावा करून सिराजच्या चेंडूवर झेलबाद झाला. त्याचवेळी टॉम हार्टले १३ धावा करून सिराजच्या गोलंदाजीवर क्लीन बोल्ड झाला.

यानंतर रूटने आपल्या कसोटी कारकिर्दीतील ३१वे शतक झळकावले. त्याने ऑली रॉबिन्सनसह इंग्लंडचा डाव सांभाळला आहे. भारताकडून आतापर्यंत आकाशने सर्वाधिक तीन विकेट घेतल्या आहेत. त्याचवेळी सिराजला दोन विकेट मिळाल्या. रवींद्र जडेजा आणि अश्विनला प्रत्येकी एक विकेट मिळाली.

## आजपासून वरिष्ठ पुरुष व महिला गट कबड्डी स्पर्धा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शहर विरुद्ध कोल्हापूर, मुंबई उपनगर विरुध्द यजमान ठाणे या पुरुषांच्या, तर पुणे विरुध्द रत्नागिरी, मुंबई शहर विरुध्द धुळे या महिलांच्या लढतीने २२व्या छत्रपती शिवाजी महाराज चषक वरिष्ठ पुरुष व महिला गट कबड्डी स्पर्धेला शनिवार (दि.२४) पासून सुरुवात होईल, पण ज्या मा. मनोहर जोशी सरांनी मुख्यमंत्री असताना पहिल्यांदा १९९७ साली शिवाजी पार्कच्या भव्य मैदानावर शिवशाही चषक या नावाने ही स्पर्धा सुरू केली त्यांच्या निधनाची दु:खाची किनार या स्पर्धेवर असेल.

राज्य क्रीडा व युवक संचालनालय व महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या यजमान पदाखाली २४ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत स्पर्धा होणार आहे. ठाणे (प.) येथील मेंटल हॉस्पिटलच्या बाजूला, साठे नगर, परबवाडी येथे सायंकाळी ७ वा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन होईल.

या स्पर्धेच्या निमित्ताने स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व जिल्ह्याच्या पुरुष व महिला संघाच्या संघव्यवस्थापक व प्रशिक्षकांची सभा २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० वा. खेळाडूंच्या निवासस्थानी घेण्यात आली आहे. सामने वेळेवर सुरू करण्याचा व संपविण्याचा संयोजन समितीचा मानस आहे. याकरिता सर्व सहभागी संघाच्या सहकार्याची अपेक्षा या पत्राद्वारे राज्य संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

## अश्विनचे इंग्लंडविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये विकेट्सचे शतक




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रविचंद्रन अश्विनने इंग्लंडविरुद्ध एक खास शतक पूर्ण केले आहे. त्याने १०० कसोटी विकेट्स पूर्ण केल्या आहेत. अश्विनने रांची येथे खेळल्या जात असलेल्या चौथ्या कसोटीत इंग्लंडविरुद्ध हा विशेष आकडा पूर्ण करीत इतिहास रचला आहे. इंग्लंडविरुद्ध १०० कसोटी विकेट्स घेणारा अश्विन पहिला भारतीय गोलंदाज ठरला. याआधी राजकोटमध्ये खेळल्या गेलेल्या तिसऱ्या कसोटीच्या माध्यमातून भारतीय फिरकीपटूने ५०० कसोटी विकेट्सचा टप्पा गाठला होता.

इंग्लंडविरुद्ध चौथ्या कसोटीत रविचंद्रन अश्विनने टीम इंडियाला मोठे यश मिळवून दिले. तुफानी फलंदाजी करणाऱ्या जॉनी बेअरस्टोला अश्विनने एलबीडब्ल्यू आऊट केले. तो ३५ चेंडूंत चार चौकार आणि एक षटकारासह ३८ धावा करून बाद झाला. ही विकेट घेताच अश्विनने इंग्लंडविरुद्ध आपल्या कसोटी विकेट्सचे शतक पूर्ण केले. अण्णा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अश्विनने इंग्लंडपूर्वी ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटीत १०० विकेट्सचा टप्पा ओलांडला आहे. अश्विनने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटीत आतापर्यंत ११४ विकेट्स घेतल्या आहेत. ही आकडेवारी पाहता अश्विन ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडसाठी कसोटीत सरस आहे असे म्हणता येईल.

**आशियातील पहिला क्रिकेटपटू**

रविचंद्रन अश्विन हा इंग्लंडविरुद्धच्या कसोटी क्रिकेटमध्ये एक हजारहून अधिक धावा आणि १०० विकेट्सचा टप्पा गाठणारा आशियातील पहिला क्रिकेटपटू ठरला आहे. अश्विनने कसोटी क्रिकेटमध्ये इंग्लंडविरुद्ध १०८५ धावा केल्या असून १०० विकेट्स घेतल्या आहेत. अश्विनने भारताकडून ९९ कसोटी सामन्यांमध्ये ५०२ विकेट घेतल्या आहेत. कसोटी क्रिकेटमध्ये अश्विनने ३४ वेळा पाच विकेट घेतल्या आहेत आणि आठ वेळा एका सामन्यात १० किंवा त्याहून अधिक बळी घेतले आहेत.

## इशान, श्रेयसला बीसीसीआय करारातून वगळण्याची शक्यता

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) श्रेयस अय्यर आणि इशान किशन यांना नव्या केंद्रीय कराराच्या यादीतून वगळले जाण्याची शक्यता आहे. या निर्णयामागील एक कारण म्हणजे बोर्डाच्या आग्रहानंतरही त्याची देशांतर्गत क्रिकेटमधून अनुपस्थिती.

दोन्ही खेळाडूंनी वेगवेगळ्या कारणांमुळे रणजी ट्रॉफी स्पर्धेत खेळताना दिसत नाहीत. आगामी आयपीएल हंगामापूर्वी इशान त्याच्या तंत्रावर काम करीत असल्याची माहिती आहे. त्याचवेळी अय्यर पाठीच्या किरकोळ दुखण्याने त्रास होत आहे, मात्र बीसीसीआयचे उच्चपदस्थ अधिकारी या दोघांवर पूर्णपणे खूश नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे त्यांच्यावर केंद्रीय करारात गंडातर येऊ शकते.

## आकाश दीपने केले संधीचे सोने

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि इंग्लंड यांच्यातील चौथा कसोटी सामना रांची येथील जेएससीए आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळला जात आहे. भारतीय संघ व्यवस्थापनाने युवा अनकॅप्ड वेगवान गोलंदाज आकाश दीपला पदार्पणाची संधी मिळाली आहे. भारताकडून कसोटी क्रिकेट खेळणारा आकाश दीप हा ३१३वा क्रिकेटपटू ठरला. त्याने मिळालेल्या संधीचे सोने करीत पहिल्याच कसोटीत तीन विकेट्स घेतल्या.

आकाश दीपचा जन्म बिहारच्या रोहतास जिल्ह्यातील देहरी गावात झाला. २७ वर्षीय आकाश दीप त्याच्या घातक इनस्विंग गोलंदाजीमुळे निवड समिती आणि भारतीय संघ व्यवस्थापनाच्या नजरेत आला.

### पदार्पणात घेतल्या तीन विकेट्स




त्याने आयपीएलमध्ये सात सामने खेळले असून त्यात त्याने सहा विकेट्स घेतल्या आहेत. आकाश दीपने २९ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये २३.१८च्या गोलंदाजीच्या सरासरीने १०३ बळी घेतले आहेत. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये त्याने चार वेळा एका डावात पाच विकेट्स घेतल्या आहेत. याशिवाय त्याने एका सामन्यात एकदा १० विकेट्स घेण्याचा पराक्रम केला आहे.

आकाश दीपला भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांनी कसाटी पदार्पणाची कॅप दिली. या वेळी आकाशची आईही त्याच्या पदार्पणाला उपस्थित होती. पदार्पणाची कॅप मिळाल्यानंतर आकाशने आईला मिठी मारली आणि भावूक झाला.

### श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रीडा महाकुंभ

## दंड बैठक स्पर्धेत अजय यादव, नभा राणे प्रथम; दोरी उडी स्पर्धेत यश जाधव, आसावरी गुरव




**मुंबई : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रीडा महाकुंभ स्पर्धेचा थरार मुंबई शहर व मुंबई उपनगरात अंतिम टप्प्यात पोहचला आहे. या स्पर्धा राज्य शासन, मुंबई महापालिका आणि क्रीडा भारती यांच्या संयुक्त विद्यमाने व मुंबई पोलीस, मुंबई विद्यापीठ, एसएनडीटी विद्यापीठ व मुंबई शहर व मुंबई उपनगर येथील संबधित क्रीडा संघटना यांच्या सहकार्याने मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहेत.

उपनगरात नेहरू नगर येथे मुंबई शहर व उपनगरातील खेळाडूंची अंतिम दंड बैठक स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत खालील खेळाडूंनी सुवर्ण, रौप्य व कांस्यपदक मिळवले.

१४ वर्षांखालील मुलांमध्ये गुलशन सिह (एमएनपी हिंदी शाळा) प्रथम, अहमद रज्जा (वामनराव शाळा) द्वितीय, आदित्य देवेंद्र (एमएनपी हिंदी शाळा) तृतीय, सोनू यादव चतुर्थ; मुलींमध्ये आरुषी यादव (गुंदवली एमपीएस शाळा) प्रथम, संध्या गौड (गुंदवली एमपीएस शाळा) द्वितीय, स्वरा देशमुख (चुनाभट्टी एमपीएस शाळा) तृतीय, समृद्धी नायक (तुळशी शाळा भांडूप) हिने चतुर्थ क्रमांक पटकाविला. १७ वर्षाखालील मुलांमध्ये प्रिन्स प्रजापती (चुनाभट्टी एमपीएस शाळा) प्रथम, रौनक केंद्रे (अमोदय विद्या मंदिर) द्वितीय, वल्लभ सावलकर (मिठानगर एमपीएस शाळा) तृतीय, निक बनसोडे (चुनाभट्टी एमपीएस शाळा) चतुर्थ; मुलींमध्ये मनीषा भूप (चुनाभट्टी एमपीएस शाळा) प्रथम, प्रिया यादव (अंधेरी टाटा कॅम्प) द्वितीय, दीक्षा खारवार (गुंदवली एमपीएस शाळा) तृतीय, रिद्धी पाठक (मिठानगर एमपीएस शाळा) हिने चतुर्थ क्रमांक मिळविला.

खुल्या गटात मुलांमध्ये अजय यादव (राहुल नगर), शब्बीर शेख (श्री गणेश शाळा), कारण सिंग (गुंदवली शाळा) स्वयंम देवळे (कांजूर मार्ग शाळा) यांनी; तर मुलींमध्ये नभा राणे, समृद्धी पवार, अर्चना सहानी व आदित्य उपाध्याय यांनी अनुक्रमे पहिले चार क्रमांक प्राप्त केले.

दोरी उडी स्पर्धेच्या अंतिम फेरीत १२, १४, १७ वर्षाखालील व १७ वर्षावरील अशा चार गटात चुरस होती. या स्पर्धेत १२ वर्षाखालील गटात मुलांमध्ये आयुष झोटे (११६), अब्दुल शेख (११५), आयुष माने (११४), यश सिंग (११३); मुलींमध्ये आयशा शेख (११८), हिवा सतरा (११७), दृष्टी दाभी (१०९), झीनत शेख (१०७) यांनी अनुक्रमे सर्वांत जास्त दोरी उड्या मारून पहिले चार क्रमांक पटकाविले.

१४ वर्षाखालील गटात मुलांमध्ये तरुण धनगर (१२९), निसर्ग नरसाळे (११७), दिशांक शाह (११४), अद्वैत रेडेकर (११३); मुलींमध्ये लक्ष्मी चौधरी (११९), आर्वी संखे (११६), अंजली स्वर्णकार (१०९), खुशी प्रजापती (१०३) यशस्वी ठरले.

१७ वर्षाखालील गटात मुलांमध्ये आयुषकुमारी नाई (१३६), निशांत गुजरान (११५), बिट्टू यादव (११२), मित दातखिळे (११०); मुलींमध्ये सान्वी जोगळेकर (११६), अलीया अन्सारी (११२), श्रद्धा कांबळे (१०५) व द्रीश्या सतरा (९७) यांनी यश मिळविले.

१७ वर्षावरील मुलांमध्ये यश जाधव (१४५), प्रवीण गुप्ता (१३५), आदित्य इप्ते (१३५), आयुष सातवसे (१०९); मुलींमध्ये आसावरी गुरव (९७), साक्षी धनकुळे (९५), आंचल सहानी (९४) व पूनम काटखाडे (९३) यांनी यशाला गवसणी घातली. सर्व विजेत्या खेळाडूंना रोख रक्कम व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## बुद्धीबळ स्पर्धेत लोबो, अहान, यश गटविजेते

**मुंबई : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५०व्या राज्याभिषेक दिनानिमित्त श्री छत्रपती शिवाजी स्मारक मंडळ (ट्रस्ट), मुंबई व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित श्री शिवाजी मंदिर बुद्धीबळ स्पर्धेत मुलांमध्ये आंतरराष्ट्रीय फिडे गुणांकित लोबो फेरडीन, अहान कातरुका, यश टंडन, लोबो देटीन आणि मुलींमध्ये मनवा पारकर, सर्वा परेलकर, साईशा मुळे यांनी गटविजेतेपद पटकाविले.



१३ वर्षाखालील मुलांमधील निर्णायक पाचव्या साखळी फेरीत लोबो फेरडीनने (४.५ गुण) अर्जुन पधारियाच्या राजाला शह देत प्रथम स्थानावर झेप घेतली. शर्मद गुरवने (३.५ गुण), द्वितीय, अर्जुन पधारियाने (३.५ गुण) तृतीय, मिहीर सोनावणेने (३.५ गुण) चौथा व अंशुमन समलने (तीन गुण) पाचवा पुरस्कार जिंकला.

मुंबई शहर जिल्हा बुध्दिबळ संघटना मान्यतेने दादर येथील राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या स्पर्धेत सात वर्षाखालील मुलांमध्ये लोबो डेटीनने (पाच गुण) प्रथम, आर्शिव गोयलने (चार गुण) द्वितीय, कबीर पिंगेने (चार गुण) तृतीय, वेदांत चिदंबरमने (तीन गुण) चौथा, प्रियांश जैनने (तीन गुण) पाचवा आणि मुलींमध्ये मनवा पारकरने (तीन गुण) प्रथम, स्वरा खटावकरने (एक गुण) द्वितीय, द्विरा मेहताने (एक गुण) तृतीय पुरस्कार मिळविला. नऊ वर्षाखालील मुलांमध्ये अहान कतारुकाने (पाच गुण) प्रथम, ओम गणूने (४.५ गुण) द्वितीय, ह्रीअन शाहने (चार गुण) तृतीय, समर्थ गोरेने (तीन गुण) चौथा, आरिष गांधीने (तीन गुण) पाचवा आणि मुलींमध्ये सर्वा परेलकरने (३.५ गुण) प्रथम, सनामरी जॉनपॉलने (तीन गुण) द्वितीय, आराध्या पुरोने (दोन गुण) तृतीय क्रमांक जिंकला. ११ वर्षाखालील मुलांच्या गटात यश टंडनने प्रथम (पाच गुण), विआन कनावजेने (चार गुण) द्वितीय, अनय भांगरेने (तीन गुण) तृतीय, अविष्कार कारेने (तीन गुण) चौथा, आयुष भामटने (तीन गुण) पाचवा आणि साईशा मुळेने (दोन गुण) प्रथम व आद्या कश्यपने (दोन गुण) द्वितीय क्रमांक मिळविला.

स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मंडळाचे कार्यकारी विश्वस्त बजरंग चव्हाण, विश्वस्त ज्ञानेश महाराव, राजेश नरे, बुद्धीबळ संघटनेचे सेक्रेटरी राजाबाबू गजेंगी, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदींच्या उपस्थितीत झाला.



**पनवेल : महापालिकेच्या निधीतून पनवेल कोळीवाड्यात उभारण्यात आलेल्या आई जरीमरी खुल्या सभामंडपाचे लोकार्पण तसेच श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे साकारलेल्या आई एकविरा मातेचे तैलचित्रचे अनावरण आणि सेल्फी पॉईंट उद्घाटन गुरुवारी झाले. या वेळ आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहराध्यक्ष अनिल भगत, माजी सभागृह नेते परेश ठाकूर आदी उपस्थित होते.**







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राइड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com